महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशनः मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः २१, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार २० ऑगस्ट २०२४ ते सोमवार २६ ऑगस्ट २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### ठाण्यात १०० एकर वन जमीन घोटाळा? आमदार जितेंद्र आव्हाड यांचा गंभीर आरोप

■ ठाणे : तृप्ती गोरे

ठाणे शहरात सुमारे १०० एकर वन जमिनीचा घोटाळा झाला आहे. शंभर एकरची वन जमीन अवघ्या ३१ कोटींमध्ये विकण्यात



आली असून त्यामध्ये अधिकारी, एका ट्रस्टचा ट्रस्टी आणि बिल्डर यांचा सहभाग आहे असा आरोप राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. लवकरच या घोटाळ्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे आव्हाड यांनी 'एक्स' पोस्टमध्ये म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) राष्ट्रीय सरचिटणीस आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी रविवारी एक्सवर एक पोस्ट केली आहे. 'ठाण्यामध्ये येत्या काही दिवसांतच एक मोठा घोटाळा उघडकीस येणार आहे.महाराष्ट्र राखीव वने असलेली जमीन एका मोठ्या ट्रस्टच्या मुख्य ट्रस्टीने विकण्याचे कारस्थान केले आहे आणि त्यामध्ये सगळे अधिकारीही सामील झालेले आहेत.

### सुप्रिया सुळेंची राखी पौर्णिमेच्या आधी टीका, '१५०० रुपयांत महिलांची मतं विकत घेण्यासाठी..'

■ मुंबई : राकेश गायकवाड

लाडकी बहीण योजनेवरुन सुप्रिया सुळे चांगल्याच आक्रमक झालेल्या पाहण्यास मिळाल्या. लाडकी बहीण योजना ही सध्या चर्चेत आली आहे. कारण या योजनेचे पैसे महिलांच्या खात्यांमध्ये जमा व्हायला सुरुवात झाली आहे. अनेक



महिलांना १५०० तर काहींना तीन हजार रुपये मिळाले आहेत. मात्र सुप्रिया सुळे यांनी एका कार्यक्रमात लाडकी बहीण योजनेवरुन सरकारवर जोरदार टीका केली आहे. महायुतीचे सरकार आल्यास लाडकी बहीण योजनेतून तीन हजार रुपये देऊ. सोबतच यापुढेही या योजनेत सातत्य राहणार असून एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील कार्यक्रमात बोलताना म्हटले. तर, पुढील पाच वर्षासाठी ही योजना निश्चित सुरू असेल, महिला भगिनींना ५ वर्षाचे ९० हजार रुपये मिळतील, असा शब्द अजित पवार यांनी पुण्यातल्या बालेवाडीतील कार्यक्रमातून दिला.

# '...तर मी राजीनामा देईन आणि राजकारणातूनही निवृत्त होईन'

## देवेंद्र फडणवीसांचं मोठं विधान



■ मुंबई : विशाल कारंडे

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे यांनी अनेकवेळा आंदोलन आणि उपोषणही केलं. मात्र, त्यांच्या मागणीबाबत राज्य सरकारने अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. दुसरीकडे मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या मागणीला ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शविला आहे. यावरूनच राज्याच्या राजकारणात मराठा आणि ओबीसी नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. यातच मराठा आरक्षणाच्या मुद्यांवरून मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही अनेकदा टीका केली. आता आरक्षणाच्या मुद्यावर बोलताना मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना म्हटलं की, 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मराठा आरक्षण देऊ इच्छित आहेत. मात्र, त्यांना देवेंद्र फडणवीस थांबवत आहेत', (शेष पृष्ठ २ वर)

## धर्मनिरपेक्ष नागरी संहिता लागू करणे ही काळाची गरज- पंतप्रधान नरेंद्र मोदी

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त ऐतिहासिक लाल किल्ल्यावरून देशवासीयांना संबोधित करताना आजवरचे सर्वात मोठे म्हणजे ९८ मिनिटांचे भाषणात देशात धर्मनिरपेक्ष नागरी संहिता लागू करणे ही काळाची गरज असल्याचे आणि धर्माच्या आधारावर देशाची विभागणी करणाऱ्या कायद्यांना आधुनिक जगात कोणतेही स्थान नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन केले. मोदी यांनी पंतप्रधानपदाच्या सलग तिसऱ्या कारकिर्दीतील पहिले आणि सलग ११ वे भाषण केले. आपण ७५ वर्षे सध्याच्याच



सांप्रदायिक नागरी संहितेसह जगलो आहोत. ही नागरी संहिता भेदभावाला खतपाणी घालण्याबरोबरच देशाची धार्मिक आधारावर विभागणी करते. विषमतेलाही प्रोत्साहन देते. आपल्याला धर्मनिरपेक्ष नागरी संहितेकडे वाटचाल करायची आहे. देशात धर्मनिरपेक्ष नागरी संहिता येणे ही काळाची गरज आहे, असे मोदी यांनी नमूद केले. धर्मनिरपेक्ष नागरी संहिता ही संविधानाचा आत्मा आहे. सर्वोच्च न्यायालयानेही तिची गरज अधोरेखित केल्याचे मोदी म्हणाले. देशातील प्रत्येक नागरिक भ्रष्टाचाराच्या वाळवीने हैराण झाला आहे. भ्रष्टाचारामुळे जनतेचा सरकारवरील, प्रशासनावरील विश्वास उडतो आणि राष्ट्रीय विकासात बाधा निर्माण होते. काहीजण मात्र या वाळवीचे समर्थन करतात, तिचे उदात्तीकरण करून तिला संरक्षण देतात. दरवर्षी २५ लाख भारतीय विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जातात. त्यामुळे येत्या पाच वर्षांत वैद्यकीयच्या ७५ हजार नव्या जागा तयार करण्यात येतील. जागा वाढल्यानंतर भारतातच चांगले शिक्षण घेता येईल.

## अंधेरीत रक्षाबंधनाचा मुहूर्त साधत 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेचा जोरदार प्रचार

■ मुंबई : सम्यक कासारे

'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना ही आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला राजकीय लाभासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने रक्षाबंधनाचे मुहूर्त साधत भाजप आणि शिंदे गटात प्रचारासाठी चढाओढ लागली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप-शिंदे गटाच्या नेत्यांच्या उपस्थितीत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून फलकबाजी व अन्य माध्यमांमधूनही योजनेचा जोरदार प्रचार करण्यात येत आहे. अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून प्रदीप शर्मा यांच्या पत्नी स्वीकृती शर्मा इच्छुक असून भाजपचे मुरजी पटेल हेही निवडणुकीची तयारी करीत आहेत. शर्मा यांनी शिंदे यांच्या उपस्थितीत तर पटेल यांनी फडणवीस यांच्या उपस्थितीत रक्षाबंधनाचे दोन स्वतंत्र कार्यक्रम आयोजित केले आहेत. लाडकी बहीण योजनेबद्दल अभिनंदन करण्यासाठी फडणवीस यांना भाजप महिला मोर्चाच्या पुढाकाराने



२५ लाख राख्या पाठविण्यात येत आहेत. भाजप व शिंदे गटातील आमदार-खासदार आणि पदाधिकाऱ्यांकडून लाडकी बहीण योजनेच्या प्रचारासाठी विविध कार्यक्रम, माहिती पुस्तिका आणि फलक लावण्यात येत आहेत.

## सातार्‍यातून लालपरी होणार कालबाह्यः MSRTC ने घेतला मोठा निर्णय

■ सातारा : यश सावंत

सातार्‍यात गेले अनेक दिवस लालपरीचा गोंधळ समोर येत होता. या लालपरीमधील अस्वच्छतेबाबत प्रवाशांमध्ये असंतोषाचे वातावरण आढळून आले होते. या एसटीच्या बिघाडामुळे प्रवासी हे अधिकाधीक त्रस्त होत होते. त्यामुळे एसटी महामंडळांची पैशांच्या बाबतीत मोठी नाचक्की होत होती. शासनानेसुद्धा या लालपरिवर अधिक खर्च केला होता, परंतु ती परिस्थिती काही बदलली नव्हती. त्यामुळे सध्या काही दिवसांपूर्वीपासूनच एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती खालावली होती. ती भरून काढण्यासाठी एसटी महामंडळाने पाणी विक्री सुरु केली त्यातून त्यांना मोठा फायदासुद्धा झाला होता. परंतु ही आर्थिक दारी अजून



किती भरून काढणार म्हणून मग यासाठी सातार्‍यामध्ये इलेक्ट्रिक बसेसची सुरुवात करण्यात आली आहे. ही बातमी साताराकरांसाठी अतिशय आनंदाची ठरली आहे. महाराष्ट्र शासनाकडून प्रवाशांच्या सेवेसाठी नव्या ई-बस सेवा सुरु करण्यात येतील अशी घोषणा केली होती.


त्यापासून कित्येक दिवस ई-बसची वाट पाहणाऱ्या नागरिकांची आता प्रतिक्षा कायमची संपुष्टात आली आहे. सातारा जिल्ह्यामध्ये ईबसेस गाड्या दाखल झाल्या आहेत. त्या बसेस या वातानुकूलित यंत्रणांच्या असणार आहेत. त्यामुळे साताराकरांचा आता वातानुकूलित बसमधून आरामदायी प्रवास करण्याची संधी मिळणार आहे. या बसेसमुळे सातारकरांचा प्रवास हा अधिक सोईस्कर आणि सुखकर होणार आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## मराठ्यांना देश चालवायचाय, आरक्षण कसले मागता? संभाजी भिडेंचा मराठा समाजाला सवाल

■ मुंबई : गणेश बागडे


राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असताना आता श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेचे प्रमुख संभाजी भिडे यांनी यावर भाष्य केले आहे. बांगलादेशमध्ये हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराचा निषेध म्हणून सांगली जिल्ह्यात २५ ऑगस्ट रोजी कडकडीत बंद पुकारला जाणार असल्याची माहिती देण्यासाठी संभाजी भिडे यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी कोलकाता बलात्कार प्रकरणापासून ते राज्यातील विविध प्रश्नांना हात घालत रोखठोक भाष्य केले. यावेळी मराठा आरक्षणासंदर्भातही त्यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर संभाजी भिडे म्हणाले की, मराठा आरक्षण हा कळीचा मुद्दा आहे. याचे उदाहरण देताना त्यांनी सांगलीतील कमांडो ट्रेनिंग कॅम्पचा उल्लेख केला. या ट्रेनिंग कॅम्पमध्ये निःशुल्क प्रवेश दिला तर वाघ आणि सिंहानी तिथे प्रवेश घ्यावा का? विमान उडविण्याच्या प्रशिक्षणासाठी



गरुडाने प्रवेश घ्यावा का? स्विमिंग क्लबमध्ये मासळी प्रवेश घेईल का? अशाच पद्धतीने मराठ्यांनी आरक्षण मागावे का? हा प्रश्न संभाजी भिडे यांनी उपस्थित केला.'मराठ्यांना उभा देश चालवायचा आहे. आरक्षण कुठे मागता? सिंहानी जंगल सांभाळायचे असते. मराठा जात ही संबंध देशाचा संसार चालविणारी जात आहे, हे मराठ्यांच्या ज्या दिवशी लक्षात येईल, त्यादिवशी या मातृभूमीचे भाग्य उजळून जाईल. हे त्यांच्या लक्षात येत नाही, हे आपले दुर्दैव आहे', असेही संभाजी भिडे यांनी सांगितले. बांगलादेशमध्ये हिंदूंवर अत्याचार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर २५ ऑगस्ट रोजी संबंध सांगली जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात येणार असल्याची घोषणा संभाजी भिडे यांनी केली. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे हा बंद पुकारण्यात आला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. तसेच बांगलादेशमध्ये जो अत्याचार सुरू आहे, त्याविरोधात भारत सरकारने कडक पाऊले उचलावीत, अशीही मागणी त्यांनी केली.

(शेष पृष्ठ २ वर)






# आमदनी अठ्ठनी, भय्या खर्चा करे रुपैया

चाळीतल्या नळावर पाण्यासाठी भांडणाऱ्या महिलांना लाजवणाऱ्या स्वरात महाराष्ट्रातले सगळे राजकारणी परस्परांशी भांडत असतात. कुणाला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण? त्याबद्दलची घोषणा लगेचच हवी असते, तर कुणाला चक्क्या आवाजात रोज विरोधकांना नावे ठेवायची असतात. सडे, ढेकूण इत्यादी प्राण्यांच्या नावाने एकमेकांना शिव्यांची लाखोली वाहणाऱ्या या सर्व नेत्यांमध्ये एकवाक्यता आहे ती दौलतजादा करण्याबाबत! सख्खे म्हणा, सावत्र म्हणा सगळे राजकीय नेते बहिणींना खूष करण्याबाबत एकदिलाने आहेत. राजकारणात जिकडे पाहावे तिकडे कैवारी भाऊराया!

आज राखीपौर्णिमा. त्यामुळे राजकारणातले भाऊ असे धावत सुटले आहेत की, बहीण द्रौपदीला मदत करणाऱ्या कृष्णाला जणू आपण काय केले मोठेसे, असा साक्षात्कार होऊन लाज वाटेल. महिलांविरील अत्याचारात महाराष्ट्राचा क्रमांक भारतात पहिला, प्रेमाला नकार देणाऱ्या तरुणीचे जीवन संपवणारी जळीत प्रकरणे घडूनही या अत्याचारांवर फुंकर मारल्याचा आव आणणारे राज्यकर्ते आणि त्यांचे विरोधक बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये द्यायला



सरसावले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मध्य प्रदेशाच्या धर्तीवर लाडकी बहीण योजना घोषित केली अन् 'शेतकरी सन्मान योजने'च्या वेळी जे साधले नव्हते ते करून दाखवत महिलांच्या खात्यात रक्कम पोहोचवली. विक्रमी वेळात सुमारे एक कोटी महिलांच्या खात्यात तीन हजार कोटी रुपये जमा करणे ही मोठीच कामगिरी. यंत्रणा मनात आले तर किती वेगाने काम करू शकते, हे कळले, पण हे कौतुक करायचे ते कोणत्या कारणासाठी? अनुत्पादक खर्चावर ४६ कोटी वर्षाकाठी उधळले जाणार आहेत म्हणून? पुरुषी वर्चस्वाच्या वातावरणात पिचणाऱ्या महिलांना दीड हजाराच्या मासिक प्राप्तीचा आधार वाटेल हे निश्चित, पण राज्याच्या तिजोरीत तेवढा खणखणाट आहे का?

महाराष्ट्राचे वित्तीय व्यवस्थापन शिस्तीचे असल्याने ही रक्कम देता आली असतीही कदाचित; पण या स्पर्धेत उतरत महिन्याला दोन हजार रुपये देण्याचा विचार काँग्रेस जाहीर करणार याचा सुगावा लागताच आम्हाला साथ दिली, तर रक्कम दुप्पट करू असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच सांगून टाकले. हे आमिष म्हणायचे की, निवडून येण्यासाठी मोजलेली दक्षिणा? एकट्या शिंदेंनाच दोष का द्या? संजय राऊत यांनीही तीन हजार रुपये देण्याची भाषा वापरली आहेच. मतदानाच्या तारखेपर्यंत कदाचित ही रक्कम चार हजारापर्यंत पोहोचेल! केवळ महाराष्ट्रातच हे होते आहे असे नाही, तर कर्नाटक, तेलंगणातही हाच मार्ग चोखाळला गेला. प. बंगालमध्ये ममतादी हेच करतात.

महिलांच्या हाती निधी खेळू नये, असे अजिबात नाही. पुरुषाच्या तुलनेत त्या तो पैसा उत्तम खर्च करतील. पण मुळात धक्कादायक घोषणा करणाऱ्या या राज्यकर्त्यांना अन् विरोधकांना अर्थकारणाचे भान आहे का? दीड हजार रुपये दिले, तर तिजोरीवर वार्षिकभार पडेल ४६ हजार कोटींचा. रक्कम दुप्पट केली, तर वर्षाचे ९२ हजार कोटी. राज्याची महसुली आवक आहे चार लाख ५१ हजार ५२३ कोटी. त्यातील जवळपास २० टक्के रक्कम या योजनेवर घालवणे अयोग्य असल्याचे अर्थतज्ज्ञ सांगतात. ४६ हजार कोटींवरच नोकरशाही नाराजी व्यक्त करीत होती. राज्याचा खर्च आहे पाच लाख ४७ हजार ४५० कोटी. आवकीत सुमारे ६.८ टक्क्यांची भर पडेल, असे म्हणतात, पण वस्तू आणि सेवाकराच्या काळात राज्ये कर आकारू शकतात ती क्षेत्रेच मर्यादित आहेत. याशिवाय कर वाढवला की, महागाई वाढणार आणि बहिणी व भाऊ दोघेही नाराज होतील.राज्याला पेट्रोलवर वाढवता येईल किंवा दारूवरचे उत्पादनशुल्क कर. तो वाढवून बहिणींना रक्कम देण्याची योजना आहे काय? महाराष्ट्रात वेतन, निवृत्तिवेतन, कर्ज, व्याजपरतफेड यावर आवकीच्या ५० टक्क्यांहून अधिक खर्च करावा लागतो. तो टाळता येणार नाही. निवडणूक जिंकण्यासाठी सुमार अर्थकारणाचा मार्ग महाराष्ट्राला अवलंबवावा लागतोय हे वेदनादायी आहे. महाराष्ट्रात राजकीय कल्पनांची वानवा जाणवतेय हे दुःखद आहे.

**सिंचन प्रकल्पांना मान्यता**

खरे तर, महाराष्ट्रात केंद्र आणि राज्य सरकारने प्रकल्पांची पेरणी सुरू ठेवली आहे. लाडकी बहीण योजनेच्या पलीकडे जाऊन काही बरे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. वैनगंगेच्या गोसेखुर्द प्रकल्पातून ४२७ किलोमीटरचा प्रवास कालव्यातून, उपसासिंचनातून करून पाणी पार बुलडाण्यातल्या नळगंगेला जोडणारा, १० वर्षे बांधकाम चालेल असा तब्बल ६० हजार कोटींचा प्रकल्प असेल किंवा १० हजार कोटींची नारपार योजना! भेगाळलेली जमीन सिंचित करायच्या या प्रकल्पांची मुहूर्तमेढ देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना झाली होती. नवे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी आल्या आल्या या योजनांना प्रसासकीय मान्यता दिली. वैनगंगा-नळगंगा शेतकरी आत्महत्यांचे तालुके ओलिताखाली आणेल आणि नारपार जळगाव, नाशिकच्या कोरड्या भागांना ओले करत दिलासा देईल. या योजना निवडणुकीवर लक्ष ठेवून आखल्या आहेत. एवढे करूनही महाराष्ट्राचा बहुतेक भाग कोरडा आहे. सरकारे येतील-जातील, पण सिंचनाच्या योजना वाहत्या राहायला हव्यात. योजना अडवत कुणी कुणाची जिरवू नये हे तरी नेते केव्हा शिकणार? सिंचन वाढले पाहिजे. पैसे वाटण्याच्या योजनांपेक्षा पाणी जिरवणे उत्तम आहे.



# सुप्त क्षमतांना साद

**दोन प्रबळ प्रादेशिक पक्षांचा पाठिंबा हा सरकारस्थापनेतला एक महत्त्वाचा घटक ठरला आहे. पण तरीही मोदींच्या भाषणाच्या शैलीत, आत्मविश्वासात आणि मांडणीत काही अपवाद वगळता मोठा फरक नव्हता. तात्कलिक चौकटींच्या बाहेर, संकुचित राजकारणाच्या पलीकडे जाऊन राष्ट्रकारणाची चर्चा करणे हेच अशाप्रसंगी अपेक्षित असते. हे औचित्य सांभाळताना देशातील सर्वसामान्य लोक आणि शासन-प्रशासन यांच्यातील संबंध अधोरेखित करण्याचा मोदींनी प्रयत्न केला. हे सगळे अशा परिस्थितीत की ज्यावेळी एकूणच सार्वजनिक चर्चाविश्व नकारात्मकतेने ग्रासलेले आहे.**

कुठल्याही सत्ताधाऱ्याला अशा प्रकारचे नकारात्मक वातावरण, निराशेचा झाकोळ नको असतो हे खरेच. परंतु मोदींच्या भाषणातील सकारात्मकता केवळ तेवढ्याच कारणासाठी आहे, असे मानणे चुकीचे होईल. लाल किल्ल्यावरील अगदी पहिल्या भाषणापासून त्यांचा जो सूर राहिला आहे, त्याचाच विस्तार यावेळी झाला. शेजारी देश अस्थिर बनलेले असताना, चीनची हडेलहप्पी दिवसेंदिवस वाढत चाललेली असताना, बांगलादेशासारख्या भारताच्या पारंपरिक मित्रदेशातही भारतविरोधी शक्ती डोके वर काढत असताना, दोन युद्धांमुळे बाधित झालेल्या पुरवठासाखळ्या अर्थव्यवस्थेपुढे जटिल प्रश्न उभे करीत असतानाही मोदींचा प्रयत्न दिसला तो इथली लोकशक्ती जागी करण्याचा.

विकासासाठी लोकांमधील सुप्त क्षमतांना त्यांनी साद घातली. आपल्या योजनांचा पाढा मोठ्या अभिमानाने वाचतानादेखील या राष्ट्रप्रगतीच्या प्रकल्पात प्रत्येक क्षेत्रातील नागरिकांचा सहभाग कसा आवश्यक आहे, याचेही सूचन ते करतात. हे सगळे चांगलेच आहे, परंतु या त्यांच्या मांडणीतही अनेक अंतर्विरोधही समोर आले, हे नाकारता येणार नाही.

सरकारवरचे लोकांचे अवलंबित्व कमी कसे होत जाईल, हे उद्दिष्ट असले पाहिजे, असे ते म्हणाले खरे; परंतु प्रत्यक्षात घडणारी प्रक्रिया नेमकी उलटी आहे. वेगवेगळ्या योजना, त्यांचा प्रचार आणि त्यातून साकारणारी राजकीय प्रक्रिया ही 'मायबाप सरकार' या कल्पनेलाच घट्ट करणारी आहे.

वेगवेगळ्या क्षेत्रातील सुधारणा या आम्ही कोणत्या दडपणामुळे वा अपरिहार्यतेतून नव्हे तर राष्ट्राच्या उन्नतीसाठी करीत आहोत, असाही मुद्दा त्यांनी मांडला. बँकिंग क्षेत्राचे उदाहरण देऊन त्यांनी विस्तार, विकास आणि विश्वास यात वाढ करण्यात यशस्वी झालो आहोत, असा दावाही केला. परंतु हे ऐकत असताना काही क्षेत्रातील सुधारणा वेगवेगळ्या कारणांनी रखडल्याचे वास्तव डाचणारे आहे. कृषिव्यवस्थेत सुधारणा व्हायला हव्यात, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

पण त्याच दिशेचा प्रयत्न म्हणून आणलेल्या तीन कृषिविधेयकांवर राजकीय सहमती मिळविण्यात सरकारला पूर्णपणे अपयश का आले, हा प्रश्न मनात येतोच. त्याचीही मीमांसा करायला हवी होती. शिक्षणातील मातृभाषेचे महत्त्व आणि प्रादेशिक भाषांचा सन्मान यावर मोदी भरभरून बोलले; पण याच संदर्भात मराठीच्या अभिजात दर्जाविषयी गेली काही वर्षे सतत मराठीभाषकांकडून प्रयत्न होत असूनसुद्धा केंद्र सरकारने त्याविषयी अद्याप पाऊल टाकलेले नाही, ही बाब खटकल्याशिवाय राहात नाही.

महिलांच्या सन्मानाविषयीचे त्यांचे उद्गार महत्त्वाचेच होते. त्याबद्दलचा त्यांचा संताप समजण्यासारखा आहे. पण अशा गुन्हेगारांवर जबर धाक निर्माण का होत नाही? मोदींनी सुचविलेला उपाय असा की गुन्हेगारांना होणाऱ्या शिक्षेला व्यापक प्रसिद्धी मिळायला हवी. पण एवढा उपाय पुरेसा आहे काय? आपल्याकडे गुन्हा घडल्यापासून आरोपीला शिक्षा होण्यापर्यंतच्या काळात किती प्रचंड कालावधी जातो, हे नव्याने सांगायला हवे असे नाही. म्हणजेच न्यायव्यवस्थेतील सुधारणांचा प्रश्न याच्याशी जोडलेला आहे. समान नागरी कायद्याच्या बाबतीत 'सेक्युलर' असा शब्द मोदींनी वापरल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. हा तर मित्रपक्षांचा प्रभाव अशीही चर्चा सुरू झाली. खरे तर धर्माधिष्ठित कायद्यांकडून धर्मनिरपेक्ष कायद्यांकडे जाणे या भूमिकेतूनच राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समान नागरी कायद्याची गरज व्यक्त करण्यात आली, तीदेखील हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून. त्यामुळे मोदी हा शब्द मुद्दाम वापरू लागले असतील, तर याचे स्वागत करायला हवे. याचे कारण समान नागरी कायद्याचा तोच तर गाभा आहे! मोदींचे प्रदीर्घ भाषण ऐकताना काही विसंगती टोचत असल्या तरी २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ते करीत असलेले आवाहन, 'राष्ट्र प्रथम' ही जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न, अर्थव्यवस्थेला बळकट करण्याला ते देत असलेले प्राधान्य, वैद्यकीय शिक्षणासाठी देशात ७५ हजार जास्त जागा उपलब्ध करून देण्याचा मनोदय आणि तरुणांना राजकारणात येण्याची त्यांनी दिलेली हाक या गोष्टी नक्कीच नोंद घेण्यासारख्या आहेत.

# असुरक्षिततेची भावना दूर करणारा सण

असुरक्षिततेची भावना खुलण्यापासुन रोखते. जे संबंध कोणत्या इच्छेच्या उद्देशाने बनतात ते आपल्या सोबत दु:ख घेऊन येतात. प्रेमातून निर्माण होणारी नाती सुरक्षितता आणतात. इच्छा आणि प्रेम यात हा फरक आहे. जेव्हा आपल्यात इच्छा असते तेव्हा आपण योग्य आणि अयोग्य यात फरक करू शकत नाही आणि स्वार्थी बनतो. जेव्हा आपण प्रेमात असतो तेव्हा आपली जाणीव वाढते. या जगात पुरेसे प्रेम आहे त्यामुळे काळजी करण्याची गरज नाही. या पृथ्वीवर अनेक चांगले लोक आहेत आणि ते तुमचे रक्षण करत आहेत. असुरक्षिततेची भावना तुम्हाला फुलण्यापासून रोखते. जेव्हा तुम्हाला असुरक्षित वाटते तेव्हा तुमची बुद्धिमत्ता मंदावते. बुद्धिमत्ता निस्तेज होते आणि तुमची दृष्टी अस्पष्ट होते. तुमच्या शरीरात अनेक हार्मोनल बदल होऊ लागतात. तुमचे शरीर खूप जास्त ॲड्रेनल तयार करते आणि तुम्हाला अशक्त वाटू लागते. तुमची प्रतिकारशक्ती प्रभावित होते.

असुरक्षिततेची भावना भावनिक आणि मानसिक स्तरावर तुमची दृष्टी अस्पष्ट करते आणि गोष्टी जशा आहेत तशा पाहण्याच्या तुमच्या क्षमतेवर गंभीर परिणाम होतो आणि याचा तुमच्या सामाजिक वर्तनावरही परिणाम होतो. विश्वास हा असुरक्षिततेवरचा उपाय आहे, असुरक्षितता आपल्याला एखाद्यावर विश्वास ठेवण्यापासून प्रतिबंधित करते. असुरक्षित वाटणाऱ्या व्यक्तीला मैत्री कशी करावी, विश्वासार्ह कसे असावे आणि समाजातील लोकांवर विश्वास कसा ठेवावा हे कळत नाही. त्यामुळे तुम्ही असुरक्षितता, नैराश्य, राग आणि वाईट वागणूक या दुष्टचक्रात अडकता.



तुमचं वागणं चांगलं नाही हेही लक्षात येत नाही. असुरक्षिततेच्या भावनेमुळे तुम्ही आयुष्यातील अनेक चांगल्या संधी आणि कोणताही नवीन उपक्रम घेण्याचा उत्साह गमावून बसता. असुरक्षिततेची भावना ही तुमची प्रगती, आनंद आणि आनंदी जीवनाचा शेवट आहे. एखादा पुरुष कितीही बलवान असला तरी त्याला कुठेतरी संरक्षणाची गरज भासू शकते आणि ही सुरक्षितता स्त्रीच्या प्रबळ इच्छाशक्तीमुळे आणि मनोभावातून येते. म्हणूनच बहिणी आपल्या भावांना राखी बांधतात आणि म्हणतात, ''मी तुमच्या रक्षणासाठी आहे.'' हे मनोवैज्ञानिकदृष्ट्या खूप महत्वाचे आहे! या रक्षाबंधनाचा संदेश आहे की तुमची असुरक्षितता मागे ठेवा. खूप राख्या तुमची वाट पाहत आहेत. जग तुमचे रक्षण करत आहे. जगाचा चांगुलपणा तुमच्या पाठीशी आहे. असुरक्षित होण्याची गरज नाही, जागे व्हा तुम्ही सुरक्षित आहात. आपल्याला असे वाटते की केवळ पुरुष बलवान आहेत आणि स्त्रिया दुर्बल आहेत, त्यांच्यात शक्ती नाही; हा गैरसमज दूर करण्यासाठी लोक म्हणाले की, महिलांमध्येही शक्ती आहे. तसे पाहिले तर स्त्री ही शक्ती आहे. पुरुष स्नायूंच्या शक्तीने संरक्षण देतो आणि स्त्री मनोबलाने संरक्षण देते. महिला भावनिक, वैचारिक आणि आत्मविश्वासाने संरक्षण करतात. महिलांची निर्धारशक्ती खूप मजबूत आहे.

पान १ वरुन...

## '...तर मी राजीनामा...

असा आरोप मनोज जरांगे यांनी केला. त्यांच्या या आरोपावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर देताना मोठं विधान केलं. फडणवीस म्हणाले, 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जर म्हटलं की, मराठा आरक्षणाबाबतचा कोणताही निर्णय घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि मी तो प्रयत्न थांबवला तर त्याच क्षणी मी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातूनही निवृत्त होईन', असं देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

'मला कल्पना आहे की, मनोज जरांगे यांचं माझ्यावर विशेष प्रेम आहे. मात्र, हे देखील सांगितलं पाहिजे की राज्याचे सर्व अधिकार मुख्यमंत्र्यांकडे असतात. इतर सर्व मंत्री हे मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अधिकारावर काम करत असतात. मी त्याही पुढे जाऊन सांगतो की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी एकत्र काम करत आहोत. त्यांना पूर्ण पाठिंबा आणि पाठबळ माझं आहे. त्यामुळे त्यांच्या या प्रश्नाचं उत्तर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारावं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जर म्हटलं की, मराठा आरक्षणाबाबतचा कोणताही निर्णय घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि मी तो प्रयत्न मी थांबवला तर त्याच क्षणी मी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातूनही निवृत्त होईन', असं मोठं विधान देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

'आजपर्यंत मराठा समाजासाठी जे काही निर्णय झाले, ते एकतर मी (देवेंद्र फडणवीस) घेतले किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले आहेत. तसेच मी मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहिलेलो आहे. त्यामुळे अशा प्रकारे जाणीपूर्वक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न हा अयोग्य आहे. आता मी पुन्हा एकदा सांगतो की जर मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं की, त्यांना मराठा आरक्षणाबाबतचा निर्णय घ्यायचा आहे. पण त्यामध्ये मी अडथळा आणला, मी निर्णय होऊ दिला नाही, तर त्याच क्षणी राजीनामा देईल आणि राजकारणामधूनही सन्यास घेईल', असं देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांच्या आरोपाला प्रत्युत्तर देताना म्हटलं आहे.

## साताऱ्यातून लालपरी...

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी तसेच एसटी महामंडळाच्या खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ही ई-बस सेवा सुरु केली आहे. साताऱ्यातील एसटी स्टँड मध्ये पहिल्या टप्प्यात पाच गाड्या दाखल झाल्या असून एसटी महामंडळाच्या आवारात ई-बससाठी आवश्यक असणारी चार्जिंग पॉईंटसुद्धा तयार करण्यात आले आहेत. या सर्व गाड्या वातानुकूलित असून ऑटोमॅटिक स्वरूपाच्या आहेत. या गाड्यांमध्ये साधारण ३५ प्रवासी वाहतूक करण्याची क्षमता आहे. दरम्यान, प्रवाशांचा प्रतिसाद आणि गरज लक्षात घेता या गाड्यांची संख्या देखील वाढवण्यात येणार आहे. तसेच या बसेसमुळे आता इंधनाचा खर्चही कमी होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## मराठ्यांना देश चालवायचाय...

कोलकाता येथे प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेली बलात्काराची घटना अत्यंत दुर्दैवी असल्याची प्रतिक्रियाही संभाजी भिडे यांनी दिली. एखाद्या स्त्रीवर बलात्कार होणे, म्हणजे मातेवर बलात्कार होणे आहे. या देशातीलच नाही तर जगातील कोणतीही स्त्री ही हिंदूंना मातेसमान आहे. कुठलीही स्त्री ही भारतमातेचे प्रगत रुप आहे. तिच्याशी आईसारखे वागले पाहीजे, असे ते म्हणाले.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**

**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**

E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**निविदा सुचना क्र. १ सन २०२३-२०२४**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र दिनांक- ०९/०८/२०२४ ते दिनांक- १६/०८/२०२४ कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. तसेच दिनांक-१९/०८/२०२४ दुपारी १७.०० वाजेपर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दीवशी निविदा उघडण्यात येतील निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगौण कामांतर्गत कांदीवली पोलीस स्टेशन आवारातील प्रकार-२ इमारत येथील एल सेक्शन मध्ये जोत संरक्षणाचे काम करणे. | Rs.७२६०३४/- |
| २ | मुळगौण कामांर्गत पोलिस हवालदार वसाहत, कांदीवली (प) मुंबई येथील प्रकार-२ इमारत क्र. १ व २ येथे गिलावा व रंगकाम व दुरुस्ती करणे. | Rs. ८०८१०७/- |
| ३ | मुळगौण कामांर्गत पोलिस हवालदार वसाहत, कांदीवली (प) मुंबई येथील प्रकार-१ इमारत क्र. १,२,३,४ येथे गिलावा व रंगकाम व दुरुस्ती करणे. | Rs. ८१६४४६/- |
| ४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ३२, पोलीस उपनिरिक्षक निवासस्थाने, बी इमारत अंधेरी (पु), मुंबई येथे अंतर्गत व बाहय गिलावा व रंगकाम करणे. | Rs.४२०७६३/- |
| ५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ८० पोलीस उपनिरीक्षकांची निवासस्थाने डो. एन. नगर येथील इमारत क्र. ८ येथे अंतर्गत गिलावा व रंगकाम करणे. | Rs.४२०१४६/- |
| ६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ३२, पोलीस उपनिरिक्षक निवासस्थाने, ए इमारत अंधेरी (पु), मुंबई येथे अंतर्गत व बाहय गिलावा व रंगकाम करणे. | Rs.४२००४७/- |
| ७ | मुळगौण कामांतर्गत ५४ पोलीस वसाहत, अंधेरी (पुर्व), मुंबई येथील ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे. | Rs.८०९७९०/- |
| ८ | मुळगौण कामांतर्गत "यु" इमारत हंजर नगर, अंधेरी (पुर्व), मुंबई येथील फ्लोरींगची दुरुस्ती करणे. | Rs.८४३७८३/- |
| ९ | मुळगौण कामांतर्गत "यु" इमारत हंजर नगर, अंधेरी (पुर्व), मुंबई येथील टेरेस वॉटरप्रुफिगचे काम करणे. | Rs.८४३८१७/- |
| १० | मुळगौण कामांतर्गत मानखुर्द येथे चेंबूर मुलांच्या घराच्या आवारात चेकर्ड टाइल्स देणे आणि घालणे. | Rs. ७५९२११/- |
| ११ | मुळगौण कामांतर्गत चिल्ड्रन एड सोसायटी कॅम्पस, मानखुर्द येथे पी/एफ पाण्याच्या टाकीची टोपी लावणे | Rs. ५१००८०/- |
| १२ | मुळगौण कामांतर्गत एम.डी.सी. होम, चिल्ड्रेन्स एड सोसायटी मानखूर्द येथील मुलांचे बॅरेक, जैन हॉस्पीटल येथे हवामान छप्परांची दुरुस्ती करणे. | Rs.२५१५२०/- |
| १३ | मुळगौण कामांतर्गत चेंबूर चिल्ड्रेन्स होम चिल्ड्रेन्स एड सोसायटी मानखूर्द येथे डायनींग हॉल येथे वॉटर टँक व पाईप लाईन बसविणे. | Rs.६२५५५०/- |
| १४ | मुळगौण कामांतर्गत चेंबूर चिल्ड्रेन्स होम चिल्ड्रेन्स एड सोसायटी मानखूर्द येथे आर.सी.सी. कव्हर बसविणे व आवारामध्ये साफ-सफाई करणे. | Rs.८४१३१५/- |
| १५ | मुळगौण कामांतर्गत चेंबूर चिल्ड्रेन्स होम मुलांचे बॅरेक क्र. ३१, ३२ चिल्ड्रेन्स एड सोसायटी मानखूर्द येथे गिलावा व रंगकाम करणे. | Rs.८४१४५५/- |
| १६ | मुळगौण कामांतर्गत नवीन बालगृह व एम.डी.सी. होम चिल्ड्रेन्स एड् सोसायटी मानखूर्द येथे आवारामधील साफ - सफाई करणे. | Rs.८०४६२५/- |
| १७ | मुळगौण कामांतर्गत चेंबूर चिल्ड्रेन्स होम येथे गवत काढणे व आवाराची साफ - सफाई करणे. | Rs.८०८३७७/- |
| १८ | मुळगौण कामांतर्गत चेंबूर होम मुलांचे बॅरेक क्र. २९, ३० चिल्ड्रेन्स एड सोसायटी मानखूर्द येथे गिलावा व रंगकाम करणे. | Rs.८३३११०/- |
| १९ | मुळगौण कामांतर्गत बालकल्याणनगरी मानखूर्द येथील मुलांचे इमारत येथे हवामान छप्परांची दुरुस्ती करणे. | Rs.७२८०५०/- |
| २० | मुळगौण कामांतर्गत बालकल्याणनगरी मानखूर्द येथे रेन वॉटर हरवेस्टींगचे काम करणे. | Rs. ४०९७३०/- |
| २१ | मुळगौण कामांतर्गत बॅरेक क्र. ६ आणि ७ चिल्डेन एड सोसायटी मानखूर्द येथे प्रसाधनगृहाचे नुतनीकरण करणे. | Rs.८४१२६०/- |
| २२ | मुळगौण कामांतर्गत पीतृवात्सल्य इमारत चिल्ड्रेन एड सोसायटी मानखूर्द येथे रेन वॉटर हरवेस्टींगचे काम करणे. | Rs. ४०९५७०/- |
| २३ | कीरकोळ दुरुस्ती अंतर्गत देवरत्न नगर पोलीस वसाहत चुनाभट्टी मुंबई येथे. प्लास्टर, पेंटिंग आणि विविध दुरुस्ती करणे. | Rs.८३९३१६/- |
| २४ | मुळगौण कामांतर्गत तीन डोंगरी वसाहतीतील सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालयासमोरील ध्वजस्तंभाचे नुतनीकरण करणे. | Rs. ७९३२६७/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ७५३३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :-
01 AUG 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/२०८३


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत राज्यात दोन वर्षांत ७,१७३ मुलांवर हृदय शस्त्रक्रिया! दरवर्षी २ कोटी मुलांची होते आरोग्य तपासणी...

**मुंबई : राकेश गायकवाड**

मुलांच्या आरोग्याचे संवर्धन आणि विकास साधण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमा'च्या माध्यमातून गेल्या दोन वर्षांत ७,१७३ मुलांवर हृदय शस्त्रक्रिया तर ६३,०७० बालकांवर अन्य शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. दरवर्षी राज्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील सुमारे दोन कोटी बालकांची दोन वेळा आरोग्य तपासणी करण्यात येते. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत ० ते १८ वर्ष वयोगटातील मुलांची तपासणी करुन मुलांमध्ये आढळणारे जन्मतः असलेले व्यंग, लहान मुलांमधील आजार, जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे होणारे आजार व अपंगत्व इत्यादी बाबींचे वेळेवर निदान करुन त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्याचे तसेच बालकांची आरोग्याची तपासणी व त्यांच्यात आढळणाऱ्या आजारांना वेळीच पायबंध घालणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाचा फायदा राज्यातील ० ते १८ वर्ष वयोगटातील जवळपास दोन कोटी मुलांना दरवर्षी होत आहे. या कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी स्तरावर ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांची वर्षातून दोन वेळेस आरोग्य तपासणी करण्यात येते. या व्यतिरिक्त शासकीय व निमशासकीय शाळेतील ६ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांनाही या आरोग्य तपासणी कार्यक्रमाचा लाभ होत आहे. या आरोग्य तपासणी दरम्यान मुलांमध्ये आढळून आलेल्या आरोग्य विषयक समस्या, अडचणीसाठी योग्य त्या संदर्भ सेवा व सर्व प्रकारचे वैद्यकीय व शल्य चिकित्सक उपचार मोफत पुरविण्यात येतात. अंगणवाडी स्तरावर एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत दोन वेळा ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांची तपासणी करण्यात आली असून, पहिल्या फेरीत ६३,४५,०४७ तर दुसऱ्या फेरीत ६७,४०,०७१ मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली



आहे. शाळा स्तरावर याच कालावधीत १,२२,०६,६२७ मुलांची तपासणी करण्यात आली असून, ३,३३४ मुलांवर हृदय शस्त्रक्रिया, तर ३२,८०१ मुलांवर इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या कालावधीत दोन वेळा ० ते ६ वर्षे वयोगटातील २,२९,०६७ बालकांना तर ६ ते १८ वर्षे वयोगटातील ५,०९,८३५ मुलांना संदर्भ सेवा देण्यात आली आहे.

या कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी स्तरावर एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत दोन वेळा ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांची तपासणी करण्यात आली असून, पहिल्या फेरीत ६७,०४,२५५ तर दुसऱ्या फेरीत ६९,७३,४१६ मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. शाळा स्तरावर याच कालावधीत १,२२,०३,८०८ मुलांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ३,८३९ मुलांवर हृदय शस्त्रक्रिया, तर ३०,२६९ मुलांवर इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या कालावधीत दोन वेळा ० ते ६ वर्षे वयोगटातील २,००,५४३ बालकांना तर ६ ते १८ वर्षे वयोगटातील ४,२४,१८२ मुलांना संदर्भ सेवा देण्यात आली आहे.

राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम १ एप्रिल २०१३ पासून लागू करण्यात आला आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाची पथके प्रत्येक तालुक्यात नियुक्त करण्यात आलेली असून, या पथकाचे मुख्यालय, ग्रामीण रुग्णालये किंवा उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय आहे. प्रत्येक पथकात एक वाहन, दोन वैद्यकीय अधिकारी, एक औषधी निर्माण अधिकारी, एक एएनएम, तपासणी साहित्य, इत्यादी पुरविण्यात आलेले आहे. आरोग्य तपासणी कार्यक्रमाचे गावनिहाय वेळापत्रक शिक्षण आणि महिला व बाल कल्याण विभागांच्या समन्वयाने तयार करुन प्रत्येक पथकास ठराविक वेळापत्रकाप्रमाणे तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे सहाय्यक संचालक डॉ संतोष माने यांनी सांगितले.

# 'एमएमआरडीए', 'एमएसआरडीसी'वर जबाबदारी; ५१,५१७ झोपड्यांचे पुनर्वसन

**मुंबई : प्रथमेश चव्हाण**

मुंबईतील रखडलेल्या २३३ झोपडपट्टी पुनर्वसन योजना आता मुंबई महानगरपालिका, म्हाडा, महाप्रित, सिडको, एमआयडीसी, एमएमआरडीए आणि एमएसआरडीसीच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येणार आहेत. राज्य सरकारने या सातही सरकारी यंत्रणांवर अंदाजे २ लाख १३ हजार ३२१ झोपड्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी सोपवली आहे. दरम्यान, एमएमआरडीए आणि एमएसआरडीसीकडून ५१ हजार ५१७ झोपड्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

यापैकी २४ हजार झोपड्यांचे पुनर्वसन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), तर २७ हजार झोपड्यांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) करणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाबरोबर




संयुक्त भागीदारी तत्वावर तीन वर्षांत हे प्रकल्प मार्गी लावावे लागणार आहेत. शक्य तितक्या लवकर हे प्रकल्प हाती घेऊन निर्धारित वेळेत ते पूर्ण करण्याचे निर्देश राज्य सरकारकडून संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. आजघडीला ५०० हून अधिक झोपु योजना विकासकांनी रखडवल्या आहेत. यात २००५ पासून २०२१-२२ पर्यंतच्या योजनांचा समावेश आहे. या योजना मार्गी लावण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. याचाच भाग म्हणून वरीलप्रमाणे शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. मात्र त्यानंतरही या यंत्रणांकडून प्रकल्प मार्गी लावण्यासाठी ठोस पावले उचलली जात नव्हती. त्यामुळे आता सरकारने तात्काळ प्रकल्प हाती घेण्याचे निर्देश दिल्याचे समजते आहे. झोपु प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी यास दुजोरा दिला.

# मुंबईतील रस्त्यावर आतापर्यंत १६ हजार खड्डे बुजवले, गणेशोत्सवापूर्वी खड्डे बुजवण्यासाठी पालिकेची यंत्रणा युद्धपातळीवर कामाला

**मुंबई : विशाल कारंडे**

पालिका प्रशासनाने या पावसाळ्यात मुंबईतील रस्त्यांवरील १६ हजारांहून अधिक खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे. तर गणेशोत्सवापूर्वी खड्डे बुजावण्यासाठी मोठी मोहीम हाती घेण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या आगमन व विसर्जन मार्गावरील खड्डे युद्धपातळीवर बुजवण्यात येणार आहेत. पावसाळ्यात मुंबईतील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडतात. त्यावरून पालिका प्रशासनावर टीका होत असते. यंदा पावसाळ्या मुंबईतील रस्त्यांवर खड्डे दिसू लागले असून पालिका प्रशासनाने यंदा विशेष काळजी घेतली होती. पालिकेच्या एकूण २२७ प्रभागांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे दुय्यम अभियंते नेमण्यात आले आहेत. पावसाळ्यादरम्यान रस्त्यांवर खड्डे पडल्यास ते बुजविण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी, तक्रार प्राप्त झाल्यानंतर साधारणपणे २४ तासांच्या आत संबंधित अभियंते व कंत्राटदारामार्फत खड्डे बुजविण्याची कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण



गगराणी यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. या निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी न झाल्यास दंडात्मक कारवाईचा इशाराही त्यांनी दिला आहे. त्यानुसार पालिका प्रशासनाने १९ अभियंत्यांना नोटीसा धाडल्या होत्या. त्यावर अभियंत्यांच्या संघटनेने नाराजीही व्यक्त केली होती. कंत्राटदार खड्डे बुजवत नाहीत, असाही आरोप करण्यात आला होता. त्यानंतर पालिका प्रशासनाने कंत्राटदारांवरही दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला. वेगवेगळ्या कंत्राटदारांना मिळून आतापर्यंत एकूण ५० लाख ५३ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

# खासदारकीला आव्हानः विनायक राऊतांच्या याचिकेवर नारायण राणे यांना समन्स

**मुंबई : यश सावंत**

माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी रत्नागिरी – सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातील भाजप नेते नारायण राणे यांच्या खासदारकीला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यांच्या याचिकेची न्यायालयाने शुक्रवारी दखल घेतली व राणे यांना



समन्स बजावून राऊत यांनी केलेल्या आरोपांवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. राणेंसह त्यांच्या प्रचार कार्यकर्त्यांनी विजय मिळवण्यासाठी भ्रष्ट आणि बेकायदेशीर पद्धतींचा अवलंब केल्याचा आरोप राऊत यांनी निवडणूक याचिकेद्वारे केला आहे. वकील असीम सरोदे यांच्यामार्फत केलेल्या राऊत यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या एकलपीठासमोर शुक्रवारी सुनावणी झाली. त्यावेळी, एकलपीठाने राणे यांना समन्स बजावून त्यांना राऊत यांच्या याचिकेवर १२ सप्टेंबरपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. लोकसभेच्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघासाठी ७ मे रोजी पार पडलेल्या निवडणुकीत राणे विजयी झाले. त्यांनी राऊत यांचा ४७,८५८ मतांनी पराभव केला. मात्र, निवडणुकीदरम्यानची एक चित्रफित समाजमाध्यमातून प्रसारित झाली. त्यात, राणे समर्थक मतदारांना पैसे वाटून राणे यांनाच मतदान करण्यास सांगत आहेत. या चित्रफितीची स्वतंत्र समितीद्वारे चौकशी करावी आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून राणे यांची खासदारकी रद्द करावी, अशी मागणी राऊत यांनी केली आहे. त्यासह याचिकेवरील अंतिम सुनावणीपर्यंत राणे यांना खासदार म्हणून काम करण्यापासून मज्जाव करावा, अशी मागणीही राऊत यांनी केली आहे.

# पाणीपुरवठ्याच्या तक्रारी तातडीने निवारण करा, मुंबई महापालिका आयुक्तांचे आदेश

**मुंबई : नितीन देवळेकर**

यंदा चांगला पाऊस झाला असून मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमध्ये आजमितीला ९३ टक्के पाणीसाठा आहे. मात्र सध्या काही निवडक ठिकाणांहून पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी येत आहेत. लोकप्रतिनिधींनी पाणीपुरवठ्याबाबत केलेल्या तक्रारींचे त्वरित निराकरण करावे, पाणीविषयक सर्वच तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांचा निपटारा योग्य वेळेतच करावा, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले.

जलवाहिन्यांतून होणारी गळती तातडीने शोधून काढावी, गळती शोधून काढण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर करावा, विविध पाळ्यांमध्ये कर्मचारी नियुक्त करावेत, पाणी गळती सापडल्यानंतर ती विनाविलंब दूर करावी, असे निर्देश महानगरपालिका आयुक्तांनी दिले आहेत. मुंबईला पाणीपुरवठा करणारे तलाव सध्या काठोकाठ भरले आहेत. मात्र तरीही काही ठिकाणी पाणी टंचाई आहे. पाण्याचा दाब कमी असल्यामुळे पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. विशेषतः मध्य मुंबईत वरळी, लोअर परळ, करीरोड या भागात गेल्या काही दिवसांपासून पाणी टंचाई आहे. त्यामुळे या



परिसरातील आमदार आदित्य ठाकरे यांनी समाजमाध्यमांवरून पाणी पुरवठ्याबाबतच्या तक्रारींवरून पालिका प्रशासनावर टीका केली होती. मुंबईत काही ठिकाणी पाणी कमी येत आहे, तर काही ठिकाणी दुषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पालिका आयुक्तांना याप्रकरणी स्पष्टीकरण देण्याचेही आवाहन ठाकरे यांनी केले होते. गगराणी यांनी शुक्रवारी जलअभियंता विभागातील अधिकाऱ्यांची एक बैठक पालिका मुख्यालयात घेतली होती. या बैठकीला अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, जल अभियंता पुरुषोत्तम माळवदे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# गरिबांवरील उपचारासाठी तीन कोटींचे एक वाहन

**मुंबई : सम्यक कासारे**

राज्यातील ग्रामीण, आदिवासी भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी फिरता दवाखाना सुरू करण्याची सार्वजनिक आरोग्य विभागाची योजना निव्वळ उधळपट्टी आहे. हा वाद मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात गेला आहे. विशेष म्हणजे, वाहन खरेदीच्या याच प्रस्तावावरून नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात



शाब्दिक चकमक उडाल्याचे सांगण्यात येते.

आषाढी वारीनिमित्त सार्वजनिक आरोग्य विभागाकडून गेल्या दोन वर्षांपासून आरोग्याची वारी पंढरीच्या दारी हा उपक्रम राबविला जातो. त्याअंतर्गत वारी मार्गावर दर पाच किमी अंतरावर आपला दवाखाना तयार करून वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरवली जाते. या योजनेची व्याप्ती वाढवून ग्रामीण, आदिवासी भागांतील नागरिकांवर उपचारासाठी फिरत्या दवाखान्याची योजना राबवण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे. मात्र, या योजनेसाठीच्या वाहन खरेदीचा प्रस्ताव वादात सापडला आहे. नागरिकांना त्यांच्या गावात, पाड्यावर जाऊन उपचार सुविधा पुरवणाऱ्या या वाहनांमध्ये तपासणी आणि उपचारासाठी आवश्यक यंत्रणा तसेच औषधे यासोबतच डॉक्टर, रुग्णसेविका, मदतनीस आदी उपलब्ध असतील. मात्र, यातील एका वाहनाची किंमत अडीच ते तीन कोटी इतकी असून अशा १०० वाहनांच्या खरेदीवर जवळपास तीनशे कोटी खर्च करावे लागणार आहेत. तसेच हे फिरते दवाखाने चालवण्यासाठी वर्षाकाठी दीड हजार कोटींच्या आसपास खर्च अपेक्षित आहे. या फिरत्या दवाखान्यांसाठी आरोग्य विभागाने अडीच ते तीन कोटींचे एक अशी सुमारे ८० ते १०० आलिशान वाहने खरेदी करण्याचा घाट घातला आहे. राज्यातील ग्रामीण भागात पुरेशी आरोग्य व्यवस्था असताना महागड्या आलिशान वाहनांची गरज काय, असा आक्षेप वित्त विभागाने या प्रस्तावावर घेतला होता. त्यामुळे आता

# मुंबईत पाच नवीन अग्निशमन केंद्रे बांधणार; कांदिवली, कांजूरमार्ग, सांताक्रूझ, चेंबूर, टिळक नगरची निवड

**मुंबई : गणेश बागडे**

शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन मुंबईत आणखी पाच ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. कांदिवली, कांजूरमार्ग, सांताक्रूझ, चेंबूर व अंधेरी येथे ही नवीन केंद्रे बांधण्यात येणार असून त्यांचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी नुकतीच याबाबतची घोषणा केली. स्वातंत्र्यदिनानिमित्त केलेल्या भाषणात त्यांनी याचा उल्लेख केला. अग्निशमन दलाच्या दर्जोन्नतीसाठी महापालिका विशेष प्रयत्न करीत असून नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी अग्निशमन दलातर्फे विविध मॉल्स, अधिक रहदारीची ठिकाणे, चाळी आणि झोपडपट्टी, उत्तुंग इमारती व रुग्णालयांमध्ये वेळोवेळी मॉकड्रील आयोजित करण्यात येत आहे. उत्तुंग इमारतींमध्ये अग्निशमन व विमोचन कार्याकरिता ३० मी. उंचीचे शिडीचे वाहन व पाच मिनी वॉटर टेंडर अग्निशमन दलाच्या ताफ्यात दाखल करण्यात आले आहे. तर ४० मी. उंचीचे टर्न टेबल लॅडर वाहन लवकरच दाखल होणार असल्याची घोषणाही आयुक्तांनी केली.अग्निशमन दलाची क्षमता व सुविधांच्या बळकटीकरण कार्यक्रमांतर्गत ठाकूर व्हिलेज



– कांदिवली (पूर्व), एल.बी. एस. मार्ग – कांजूरमार्ग (प.) या दोन्हीही ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्रे बांधण्याचे काम लवकरच पूर्ण होणार आहे. जुहू तारा रोड – सांताक्रुझ (प.), माहूल रोड-चेंबूर व टिळक नगर येथे नवीन अग्निशमन केंद्रे बांधण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. अग्निशमन दलाच्या दर्जोन्नतीसाठी चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध प्रकल्पांसाठी २३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# अपंगासाठीचे सल्लागार मंडळ अद्यापही कार्यान्वित नाही, राज्य सरकारच्या उदासीन भूमिकेवर उच्च न्यायालयाचे ताशेरे

**मुंबई : विशाल कारंडे**

अपंग व्यक्तींशी संबंधित कल्याणकारी धोरण आखणारे राज्य सल्लागार मंडळ महिन्याभरात कार्यान्वित करण्याचे आदेश देऊन महिना उलटला तरी अद्याप कार्यान्वित करण्यात आले नाही. यावरून उच्च न्यायालयाने शुक्रवारी राज्य सरकारला फटकारले. न्यायालय हे निष्क्रिय अथवा अकार्यक्षम असल्याचे दाखवण्याचा सरकारचा हेतू आहे का? असा संतप्त प्रश्न करून न्यायालयाने सरकारच्या प्रकरणातील उदासीन भूमिकेवर ताशेरे ओढले. तसेच, महाधिवक्त्यांनीच आता या प्रकरणी लक्ष घालावे आणि सल्लागार मंडळ कधीपर्यंत कार्यान्वित होईल हे स्पष्ट करावे, असे आदेश न्यायालयाने दिले. सल्लागार मंडळ स्थापन करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले असले तरी ते स्थापन करण्याबाबतची घटनात्मक तरतूद विधिमंडळाने केली आहे. त्यामुळे, सरकारच्या या प्रकरणातील उदासीन भूमिकेकडे डोळेझाक करू शकत नसल्याचेही न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने सुनावले.

या समितीतील अशासकीय सदस्यांची नावे निश्चित करण्यासाठी राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली. परंतु, त्यात याबाबत निर्णय घेण्यात आला नाही, अशी माहिती न्यायालयाला देण्यात आली. त्यावर, खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये सदस्यांची निवड करण्यात आली होती. त्यानंतर सल्लागार मंडळ कार्यान्वित करण्यासाठी नावे अंतिम करण्याचे आदेश न्यायालयाने



११ जुलै रोजी दिले आहेत. त्यामुळे, हे न्यायालय निष्क्रिय अथवा अकार्यक्षम असल्याचे दाखवण्याचा तुमचा हेतू आहे का? तुम्हाला असे वाटते की आमच्या आदेशाचे पालन कसे करावे हे आम्हालाच माहीत नाही? मग तुम्हीच सांगा आम्ही काय करायचे? अशी प्रश्नांची सरबत्ती मुख्य न्यायमूर्ती उपाध्याय यांनी सराकरी वकिलांकडे केली. हे प्रकरण सुनावणीसाठी येण्याच्या एक दिवस आधी म्हणजे १३ ऑगस्ट रोजी अधिकाऱ्यांनी बैठक घेतली. मात्र, नावे निश्चित न झाल्याने त्यांनी न्यायालयाकडे आणखी वाढीव वेळ मागितला. आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले. न्यायालयाचा आदेश आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही कळवला. परंतु, आणखी वेळ लागेल असे अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे सरकारी वकील अभय पत्की यांनी खंडपीठाला माहिती देताना सांगितले. त्यावर, न्यायालयाने संताप व्यक्त केला. तसेच, न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला जात असल्याचा टोलाही हाणला. त्यानंतर, नावे निश्चित करण्यासाठी अखेरची संधी देण्याची विनंती सरकारी वकिलांनी न्यायालयाकडे केली. परंतु, यासंदर्भात किमान प्रतिज्ञापत्र दाखल करणे, अपेक्षित होते, असे न्यायमूर्ती बोरकर यांनी सुनावले.

न्यायालयाचे आदेश असतानाही सरकारी अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्या या कृतीकडे आम्ही डोळेझाक करायची का? कठोर निर्णय घेण्यास भाग पाडू नका, असे न्यायालयाने महाधिवक्त्यांनाही सुनावले. तसेच या प्रकरणी लक्ष घालण्याचे आणि सल्लागार मंडळ कधीपर्यंत कार्यान्वित होणार? हे स्पष्ट करण्याचे आदेश दिले. सल्लागार मंडळ कार्यान्वित नसल्याने त्याचे काम आम्हाला करावे लागत आहे, असेही न्यायालयाने सुनावले.

महाराष्ट्र शासन
**इमारती बांधकाम विभाग,**
**मुलुंड, मुंबई रा.का.वि.यो. रुग्णालय आवार,**
**एल.बी.एस. मार्ग,**
**मुलुंड, मुंबई – ८०.**
bcmulund.ee@mahapwd.gov.in
दुरध्वनी क्रमांक .०२२-२५६१०६३३ फॅक्स - २५६१०६३३

**ई -निविदा सुचना क्र. ०१ सन २०२४-२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, इमारती बांधकाम विभाग, मुलुंड, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २५६१०६३३) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील मुंबई उपनगर (पूर्व उपनगर ) मजूर सहकारी संस्था ज्या सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र नोंदणीकृत असतिल खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविल आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इमारती बांधकाम विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत शासकीय निवासस्थाने घाटकोपर इमारत क्र. ४ व ५ न.भु.मा.क्र.१९४ - ब घाटकोपर (पुर्व) मुंबई. | २६,८८,११४/- |
| २ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत शासकीय निवासस्थाने घाटकोपर इमारत क्र. ६,७ व ८ न.भु.मा.क्र.१९४ - ब घाटकोपर (पुर्व) मुंबई. | ४९,७०,४४३/- |
| ३ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत शासकीय निवासस्थाने घाटकोपर इमारत क्र. ९ व १० न.भु.मा.क्र.१९४ - ब घाटकोपर (पुर्व) मुंबई. | २६,००,६४०/- |

निविदा स्विकारण्याचा अथवानाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , इमारती बांधकाम विभाग, मुलुंड, मुंबई- ८०. यांनी राखून ठेवला आहे. अट असलेलीनिविदा स्विकारलीजाणार नाही.

खालील संकेत स्थळावर ई-निविदा ची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1)www.mahapwd.com
2)www.mahatenders.gov.in

निविदा सुचने मध्ये काही बदल / सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्त पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

**ई-निविदा उपलब्ध कालावधी- १४/०८/२०२४. ते दि. २१/०८/२०२४ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे- दि. २२/०८/२०२४**

जा.क्र.काअ/ईबांवि/निविदा/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
इमारती बांधकाम विभाग,
मुलुंड, मुंबई- ८०
दि.-

(सुरेखा शिवाजी पवार)
कार्यकारी अभियंता,
इमारती बांधकाम विभाग,
मुलुंड, मुंबई- ८०

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१९४१

# ठाण्याच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्पाला केंद्र सरकारचा हिरवा कंदील, सहा डब्यांच्या मेट्रोवर अखेर शिक्कामोर्तब

■ ठाणे : तृप्ती गोरे

ठाणेकरांना सार्वजनिक वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी ठाणे महापालिकेने आखलेल्या १२ हजार २०० कोटींच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्पास केंद्र सरकारने अखेर हिरवा कंदील दाखविला आहे. सहा डब्यांच्या मेट्रोवर अखेर केंद्र सरकारने शिक्कामोर्तब केले असून यामुळे गेले अनेक वर्षे कागदावर असलेला हा बहुचर्चित प्रकल्प आता मार्गी लागला आहे. या मेट्रोची सुरवात २०२९ पर्यंत होणार असून या प्रकल्पामुळे ठाणेकरांचा प्रवास अधिक सुखकर आणि गतिमान होणार आहे.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत वडाळा-घाटकोपर ते गायमुख या मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू आहे. कापुरबावडी येथून भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. याशिवाय, ठाणेकरांना सार्वजनिक वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी ठाणे महापालिकेने अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारणीचा निर्णय होता. ठाणे शहरातून जाणाऱ्या दोन्ही मुख्य मेट्रो मार्गांना पुरक ठरेल असा अंतर्गत मेट्रोचा आराखडा महापालिकेने महामेट्रोच्या (महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड) मदतीने तयार केला होता. या प्रकल्पासाठी १२ हजार २०० कोटींचा खर्च अपेक्षित



धरण्यात आला होता. हा प्रकल्प ठाणे महापालिकेने राज्य शासनाची मंजुरी घेऊन केंद्र शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविला होता. परंतु काही तांत्रिक कारणास्तव हा प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत होता. या प्रस्तावास अखेर केंद्र सरकारने शुक्रवारी मंजुरी दिली. ठाणे शहरातील अंतर्गत भागासाठी पालिकेने सहा डब्यांची मेट्रो प्रकल्पाची आखणी केली होती. परंतु मोठ्या शहरांमध्ये सहा डब्यांची मेट्रो तीन मिनिटांच्या अंतराने चालविण्यात येते. यामुळे ठाण्यात तीन डब्यांची मेट्रो दीड मिनिटांच्या अंतराने चालवावी अशी सूचना केंद्राने केली होती. दरम्यान ठाणे शहराचा वाढता आवाका लक्षात घेता ही मेट्रो सहा डब्यांची हवी असा आग्रह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धरला होता. या संदर्भात त्यांनी गेल्या वर्षी तत्कालीन केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी यांची भेट घेतली. या भेटीत ठाणे शहराची भविष्यातील गरज लक्षात घेऊन हा प्रकल्प सहा डब्यांचा असायला हवा अशी भूमीका मुख्यमंत्र्यांनी मांडली होती. तसेच सहा डब्यांच्या मेट्रोची गरज का आहे, हेही त्यांनी पटवून दिले होते. त्यानंतर केंद्राकडून या प्रस्तावाबाबत विचार सुरू असतानाच, गुरुवारी केंद्र सरकारने या प्रकल्पास मान्यता दिली. या प्रकल्पाला मान्यता दिल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय शहरे विकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांचे मुख्यमंत्री शिंदे यांनी आभार मानले आहेत.

असा आहे ठाणे रिंग मेट्रो प्रकल्प

एकूण २९ किमी लांबीच्या या प्रकल्पात २६ किमी लांबीचा मार्ग हा उन्नत असून ३ किमीचा मार्ग हा भूमिगत आहे. प्रकल्पांर्गत एकूण २२ स्थानके असून त्यातील दोन स्थानके भूमिगत असणार आहेत. त्यातील एक भूमिगत स्थानक ठाणे रेल्वे स्थानकाला जोडले जाणार आहे. अन्य स्थानके शहरातील मेट्रो कॉरिडॉरला जोडली जाणार आहेत.

## मनवेलपाडा तलावात डॉ. आंबेडकरांचा पुतळा उभारणार, पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांचे निर्देश

■ वसई : सुचिता देशमुख

विरारच्या मनवेलपाडा तलावात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिले. दरम्यान, कार्यकर्त्यांनी उभारलेला मनवेलपाडा नाक्यावरील डॉ आंबेडकरांचा पुतळा हटवू नये आणि आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल करू नये असे निर्देशही त्यांनी दिले. विरार पूर्वेच्या मनवेलपाडा तलावात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याची मागणी २०१८ पासून पालिकेकडे करण्यात येत होती. परंतु पालिकेने आश्वासन देऊनही मागणी पूर्ण केली नाही आणि तलावाचे सुभोभिकरण केले. यामुळे विविध पक्ष आणि संघटनेतील आंबेडकरी कार्यकर्त्यांनी तलावासमोरील चौकात बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धाकृती पुतळा उभारला. जो पर्यंत तलावात पुतळा उभारला जात नाही तो पर्यंत नाक्यावरील अर्धाकृती पुतळा हटवला जाणार नाही, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली होती. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता. या वादात्या पार्श्वभमीवर संविधान



कृती समितीने पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली. कायदेशीर बाबी तपासून मनवेल पाडा तलावात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यासाठी पु निर्देश त्यांनी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार आणि जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांना दिले. पुतळा आंदोलनकर्त्यांवर कुठलेही गुन्हे दाखल न करण्याचे निर्देशही त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना दिले.

## कल्याण-डोंबिवलीतील ११८ हेक्टर सरकारी जमिनीवर ८ हजार ५७३ बेकायदा बांधकामे

■ कल्याण : आकाश कांबळे


कल्याण-डोंबिवली पालिका हद्द आणि कल्याण तालुक्याच्या ग्रामीण हद्दीतील ११८ हेक्टर १८ एकर सरकारी जमिनीवर आठ हजार ५७३ बेकायदा बांधकामे उभी आहेत. वाणिज्य, रहिवास आणि शेती अशा तीन प्रकारांमध्ये ही बेकायदा बांधकामे स्थानिक प्रशासनांच्या बांधकाम परवानग्या न घेता, महापालिका आणि शासनाचा कोट्यवधी रूपयांचा महसूल बुडवून हे बेकायदा इमले ठोकण्यात आले आहेत.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील सन २००७ पर्यंतचा ६७ हजार ९४७ बेकायदा बांधकामांचा विषय मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यानंतरच्या सतरा वर्षाच्या कालावधीत ९७ हजाराहून नवीन बेकायदा बांधकामे पालिका हद्दीत उभी राहिली आहेत. कडोंमपा हद्दीत एक लाख ६५ हजार बेकायदा बांधकामे उभी आहेत, अशी माहिती स्थानिक रहिवासी आणि याचिकाकर्ते हरिश्चंद्र म्हात्रे यांनी जनहित याचिकेव्दारे मुंबई उच्च न्यायालयात दिली आहे. म्हात्रे यांच्या याचिकेवरून मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय



आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने कल्याण डोंबिवली पालिका आणि ग्रामीण हद्दीत किती बेकायदा बांधकामे उभी आहेत, अशी माहिती देण्याचे आदेश जानेवारीमध्ये महसूल विभागाला दिले होते. कल्याणचे उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांनी तहसीलदार सचिन शेजाळ यांचा कडोंमपा आणि ग्रामीण हद्दीतील बेकायदा बांधकामांचा अहवाल न्यायालयाला सादर केला आहे. मंडळ अधिकारी, तलाठी, पालिका आणि पोलीस यांनी संयुक्त कारवाई करून बहुतांशी बांधकामे जमीनदोस्त केली आहेत, असे प्रतिज्ञापत्र उपविभागीय अधिकारी गुजर यांनी न्यायालयाला दिले आहे. अधिक माहितीसाठी पालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांना बेकायदा बांधकामांवरील कारवाईच्या नियोजनाविषयी संपर्क साधला. ते व्यस्त होते. कल्याण डोंबिवली पालिका शहरी भागात सरकारी जमिनीवर सात हजार ७९३ इमारती, चाळींची, ४५९ वाणिज्य स्वरुपाची बेकायदा बांधकामे आहेत. ठाकुर्लीतील ४३ हेक्टर ३७ एकर क्षेत्रावर १६३९ बेकायदा इमले, ४२३ वाणिज्य बांधकामे, टिटवाळ्यातील १५ हेक्टर १५ एकर क्षेत्रावर २५७३ बेकायदा इमले, कल्याणमधील ३१ हेक्टर क्षेत्रावर ३५८१ बेकायदा बांधकामे आहेत.

कल्याण ग्रामीणमधील नडगाव, म्हारळ मंडळ विभागात २८ हेक्टर २५ एकर क्षेत्रावर ८०० बेकायदा बांधकामे आहेत. म्हारळमधील सर्व्हे क्रमांक १९ वरील १७ हेक्टर ९ एकर क्षेत्रावर ५६४ घरे, तीन वाणिज्य बांधकामे आणि चार ठिकाणी शेती केली जाते. नडगाव मधील सर्व्हे क्रमांक ११ हेक्टर १५ एकरवर २१६ बेकायदा घरे, १३ ठिकाणी शेती केली जाते. डोंबिवली एमआयडीसीतील ८९ एकर (३६ हेक्टर) क्षेत्रावर बेकायदा इमले उभे आहेत. बेकायदा इमारतींना महारेराची नोंदणी प्रमाणपत्र जोडणाऱ्या डोंबिवलीतील ६५ माफियांवर पालिकेने गुन्हे दाखल केले आहेत.



## वाशी सेक्टर २६ येथे धुरकट वातावरण, रासायनिक कारखान्यांमधून वायू प्रदूषण पुन्हा सुरू

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

पावसाळयात पावसाच्या शिडकाव्याने वातावरण स्वच्छ होते, मात्र आता पावसाची उघडीप सुरू असून वाशी सेक्टर २६ येथे पुन्हा धुरकट वातावरण पसरून दर्प वास सुटला होता. त्यामुळे एमआयडीसीमधील रासायनिक कारखान्यांमधून पुन्हा वायू प्रदूषण करण्यास सुरुवात झाली आहे, असा आरोप स्थानिक रहिवासी करीत आहेत. शहरात महापे औद्योगिक क्षेत्राचा समावेश आहे. वाशी, घणसोली, कोपरखैरणे विभाग हे औद्योगिक पट्ट्याला लागूनच वसलेले आहेत. त्यामुळे औद्योगिक पट्ट्यात होणाऱ्या प्रदूषणाचा फटका या विभागांना अधिक होत असतो. कोपरी गाव, वाशी सेक्टर २६ या परिसरात बुधवारी पहाटेच्या सुमारास मोठ्या प्रमाणात हवेत धूलिकण आढळले होते. मात्र हे धूलिकण नसून रसायनेयुक्त वायू हवेत सोडल्याने परिसरात दुर्गंधी येत होती. याबाबत येथील नागरिकांनी वारंवार तक्रार केल्याने प्रदूषण मंडळाने या ठिकाणी गस्त वाढवली होती. तर नवी मुंबई महापालिकेने हवेतील धूलिकणावर नियंत्रण मिळविण्यासाठी धूळशमन यंत्राद्वारे पाणी फवारणी सुरू केली होती. पावसाला सुरुवात होताच वायू प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांनी थोडी उसंत घेतली होती. मात्र आता पावसाने उघडीप घेतली असून एमआयडीसीमधील रासायनिक कारखान्यांमधून पुन्हा एकदा वायू प्रदूषण करण्याचे प्रकार सुरू झाल्याची तक्रार नागरिकांमधून होत आहे. कोपरी गाव, वाशी सेक्टर २६ परिसरात होणाऱ्या वायू प्रदूषणाबाबत मुख्यमंत्री, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ तसेच नवी मुंबई महानगर यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत.

## मालकाने पगार न दिल्याने तीन तरुणींचे अजब कृत्य, पाण्याच्या बाटलीतून लघुशंका प्यायला दिल्याचा रचला बनाव

■ अंबरनाथ : सतिश सोनावणे

पगार मिळत नाही म्हणून अनेक लोक मालकाशी भांडतात. पगार मिळवण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवतात. मात्र वसईतील एका कंपनीत काम करणाऱ्या तीन तरुणींनी एक अजब शक्कल लढवली होती. या तरुणींनी आपल्यापाण्याच्या बाटलीत मालकाने लघुशंका भरून दिल्याची तक्रार पोलीस ठाण्यात केली. सुरुवातीला पोलीस देखील या अजब आरोपाने चक्रावले होते मात्र पोलीस तपासात हा बनाव असल्याचे निष्पन्न झाले.

वसई पूर्वेच्या नवघर येथे इमिटेशन ज्वेलरी बनाविन्याचा एक छोटा कारखाना आहे. या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या तीन तरुणींनी माणिकपूर पोलीस ठाण्यामध्ये एक अजब तक्रार दाखल केली. आमच्या पाण्याच्या बाटलीमध्ये कंपनी मालकाने लघुशंका केल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी या तक्रारीत केला होता. या विचित्र आरोपाने पोलीस देखील चक्रावले.

पोलिसांनी लगेच कंपनीमध्ये चौकशी सुरू केली रात्रपाळीत काम करणाऱ्या सर्व कामगारांना आणले त्यांची कसून चौकशी सुरू केली. त्यांना पोलिसी भाषेत 'प्रसादही' दिला मात्र कोणीच कबुली कबुली देईना. कंपनीत सीसीटीव्ही कॅमेरे देखील नव्हते त्यामुळे नेमका काय घडलं हे कळायला मार्ग नव्हता. इमिटेशन सगळा किळसवाणा प्रकार रात्री



झोपायला आलेल्या कामगारांनीच केल्याचा आरोप या मुलींनी केला होता. याची तक्रार कंपनीच्या मालकाकडे केली असता त्या मालकाने उलट त्या मुलींवरच संशय घेतला होता. त्यानंतर संतापलेल्या त्या मुलींनी थेट वसईचं माणिकपूर पोलीस ठाणे गाठलं आणि आपली लेखी तक्रार पोलिसांना दिली. मात्र पोलिसांनी जेव्हा या मुलींची उलट तपासणी केली तेव्हा घडलेला प्रकार समोर आला.

काहीही समोर येत नसल्याने मोठा पेच निर्माण झाला होता. अखेर पोलिसांना संशय आला आणि त्यांनी या तीन तरुणीची उलट चौकशी केली. तेव्हा त्यांनी हा बनाव रचल्याची बाब समोर आली. स्पष्ट झाले. कंपनी मालकांने त्यांना पगार दिला नव्हता. हा रखडलेला पगार मिळावा आणि कंपनी मालकाला धडा शिकवावा यासाठी त्यांनी हा बनाव रचल्याचे माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी सांगितले.

या तरुणींनी दिलेल्या तक्रारीचा आम्ही गांभीर्याने तपास केला. मात्र त्यात काही निष्पन्न झाले नाही. आम्ही या तरुणीने आज पुन्हा पोलीस ठाण्यात बोलून चौकशी करणार आहोत. त्यातून काय निष्पन्न होते का ते तपासले जाईल अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी दिली आहे.

## केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक स्थापन, नवी मुंबईतील अतिक्रमणांवरील कारवाईतील टाळाटाळ रोखली जाणार

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

शहरात अनाधिकृत बांधकामांचे पेव फुटले असून त्यावरील कारवाईत टाळाटाळ केली जात असल्याचे निदर्शनास आले. तसेच फेरीवाल्यांना कारवाईचा आधीच सुगावा लागत असल्याने अडचणी येतात. परंतु, आता पालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार सात जणांचे मुख्यालय स्तरावर केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक निर्माण केले आहे.



नवी मुंबई महापालिकेच्या आठ विभाग अधिकाऱ्यांना शहरातील कोणत्याही विभागात केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक त्या ठिकाणी कारवाईचे आदेश देईल तेथे कारवाई करावी लागणार असून त्यामुळे अतिक्रमणविरोधी कारवाईत पारदर्शकता येणार आहे.

उच्च न्यायालयाने ३१ डिसेंबर २०१५ आधीची आणि नंतरची किती बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत याचे सर्वेक्षण करा तसेच २०१५ सालानंतरच्या बेकायदा बांधकामांवर कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने यापूर्वीच नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. नवी मुंबईत सुमारे चार हजारांच्या वर अनधिकृत बांधकामे आहेत. आता मुख्यालय स्तरावरच केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक निर्माण केल्याने आता शहरात कारवाईचा सपाटा पाहायला मिळणार असून लागेबांधे निर्माण झाल्याने कारवाईत होणारी टाळाटाळ संपुष्टात येणार आहे.

विभाग कार्यालयातील फेरीवाल्यांच्या कारवाईसाठी जाणाऱ्या पथकातील काही जणांचे हितसंबंध निर्माण होऊन अतिक्रमण पथक पोहोचण्याआधीच फेरीवाले तिथून जात असल्याचे पाहायला मिळत होते. आता कोणत्याही विभागातील कारवाईसाठीचे तात्काळ निर्देश मिळणार असल्याने छुपी सौदेबाजी तसेच कारवाईतील टाळाटाळ रोखली जाणार आहे. शहरात अनधिकृत बेकायदा बहुमजली इमारतींची संख्याही मोठी आहे. पालिका फक्त नोटीस बजावून संबंधित सदनिका अनधिकृत असून या ठिकाणी नागरिकांनी सदनिका खरेदी करू नये असे आवाहन करते. याच अनधिकृत बांधकामांकडे केलेल्या दुर्लक्षामुळे हजारो नागरिकांची फसवणूक होत आहे, आता त्यावर अंकुश येणार आहे. पालिका अधिकाऱ्यांकडून अतिक्रमणाबाबत काणाडोळा केला जात होता.

## मुंबईचा जैविक कचरा अंबरनाथमध्ये? जांभिवलीच्या औद्योगिक वसाहतीत भूखंड देण्याच्या हालचाली

■ अंबरनाथ : सुचिता देशमुख

**प्रदूषणामुळे वादात सापडलेला मुंबईतील गोवंडी आणि देवनार परिसरातील जैविक कचरा प्रक्रिया प्रकल्प लवकरच अंबरनाथजवळ स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विभागाकडे या प्रकल्पासाठी अंबरनाथच्या जांभिवलीतील औद्योगिक वसाहतीत भूखंड देण्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हा प्रकल्प रायगड जिल्ह्यातील वाशिवलीतील वडगाव ग्रामपंचायतीत सुरू केला जाणार होता. मात्र, स्थानिकांच्या विरोधानंतर तो अंबरनाथजवळ आणला जात आहे.**

मुंबईतील गोवंडी आणि देवनार परिसरातील प्रदूषणाबाबतचा प्रश्न विधानसभेत उपस्थित झाल्यानंतर असे प्रकल्प रायगड जिल्ह्यात स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. दोन वर्षांपूर्वी मे. 'एसएमएस इन्वोक्लिन प्रायव्हेट लिमिटेड' यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार जागा देण्याच्या हालचाली सुरू होत्या. जैविक कचरा ही बृहन्मुंबई महानगरपालिकेची महत्त्वाची सेवा असल्याने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी मुंबईनजीकच्या परिसरात महामंडळामार्फत जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार संबंधित कंपनीला संयुक्त जैविक कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधेसाठी पाताळगंगा, बोरिवली-औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटप करण्यास मंजुरी देण्यात आली होती. मात्र वाशिवलीच्या ग्रुप ग्रामपंचायत, वडगाव तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि संघटना यांनी एमआयडीसीकडे तक्रार दाखल केली होती.

या प्रकल्पामुळे बोरिवली गाव, बोरिवली ठाकूरवाडी, कैरे, कैरे आदिवासीवाडी, शिवाजीनगर कैरे, वडगाव आणि इतर लगतच्या भागांत कचऱ्यापासून दुर्गंधी पसरण्याच्या भीतीने या प्रकल्पाला विरोध करण्यात आला. या प्रकल्पामुळे परिसरात रोगराई वाढून मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण आणि जल प्रदूषण होणार होते. मानवी आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत घातक आणि धोकादायक असा प्रकल्प असल्याने याला विरोध करण्यात आला. त्यामुळे हा प्रकल्प रायगडमधून आता ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ परिसरात आणण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. जैविक कचरा प्रकल्पाच्या मानवी आरोग्यावरील घातक परिणामांचा कोणताही विचार करण्यात न आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अंबरनाथ शहरातील औद्योगिक वसाहतींमुळे आधीच प्रदूषणात वाढ झाली आहे. जल, वायू प्रदूषणामुळे नागरिकांना अनेकदा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अशा प्रकल्पाला अंबरनाथमध्येही विरोध होण्याची शक्यता आहे. येथे यापूर्वी



बृहन्मुंबई महापालिकेने कचरा प्रकल्प आणण्याचा प्रयत्न केला, त्याला विरोध झाला होता.

अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक वसाहतीतील जांभिवली फेज-४ यातील भूखंड क्र. जेबी-३३ हा २३,७६३ चौरस मीटरचा भूखंड या प्रकल्पासाठी देण्याच्या हालचाली सुरू आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विभागाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत हा मागणी केलेला भूखंड आरेखित भूखंड असून वाटपास उपलब्ध आहे, असा शेरा मंडळाने दिला आहे. त्यामुळे लवकरच यावर निर्णय होण्याची शक्यता आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील देवनार आणि गोवंडीचा जैविक कचरा प्रकल्प अंबरनाथमध्ये स्थलांतरित होईल.


महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय

Email :- integratedmumbai.ce@mahapwd.com

दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६

ई-निविदा सुचना क्र. ०३ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता "ब-१" नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | एसटीसी कंपाऊंड, मुंबई येथे तुटलेली आरसीसी पाण्याची टाकी आणि प्लॅटफॉर्मसह नवीन सिंटेक्स पाण्याच्या टाक्या उपलब्ध करून देणे. | १५८२१६८/- |
| २ | एलटी मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई येथे दरवाजे, खिडक्या, फ्लोअरिंग रूम आणि टॉयलेट ब्लॉकची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | २४२२८७४/- |
| ३ | जी.जे. भोसले मार्ग, मुंबई विधी बिल्डिंग, येथील फ्लॅट क्र. ३ मध्ये स्टोरेज युनिट पुरवणे, पुरवठा करणे आणि फिक्सिंग करणे, वॉल पॅनेलिंगचे काम करणे. | १९९३४९८/- |
| ४ | जी.जे. भोसले मार्ग, मुंबई सारंग बिल्डिंग, येथील फ्लॅट क्र.७ मध्ये स्टोरेज युनिट पुरवणे, पुरवठा करणे आणि फिक्सिंग, वॉल पॅनेलिंगचे काम. | १९९४१७०/- |
| ५ | नवीन स्मॉल कॉज कोर्ट बिल्डिंग, मुंबई येथे खराब झालेले C.I., G.S.W. जुनी आणि पाईप लाईन आणि ड्रेनेज चेंबरची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ४४८९२३७/- |
| ६ | स्मॉल कॉज कोर्ट, मुंबईच्या ग्राउंड ते २ऱ्या मजल्यावरील कमान खिडकी आणि दरवाजाची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ७१९९४७६/- |
| ७ | स्मॉल कॉज कोर्ट, मुंबईच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावरील कमान खिडकी आणि दरवाजाची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ४८०००२८/- |
| ८ | जी.जे. भोसले मार्ग, मुंबई सारंग बिल्डिंग, येथील मजला क्र.७ अंतर्गत स्ट्रक्चरल दुरुस्ती आणि मजबुतीकरण करणे. | १९५८३९३/- |

(एकूण ०८ कामे)

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १३/०८/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दिनांक २०/०८/२०२४ रोजी १७.०० पर्यंत

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक २३/०८/२०२४ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)

३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

स्थळप्रत का. अ. यांनी मंजूर केला आहे

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/ ११९५

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,

बांधकाम भवन, २ रा मजला,

२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६

दिनांक : ०९/०८/२०२४

कार्यकारी अभियंता,

एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,

मुंबई-४०० ००१.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/ २०२१

# झोपडीधारकांच्या दुर्दशेबाबत उच्च न्यायालयाने व्यक्त केली चिंता, काय म्हणाले?

■ मुंबई : गणेश बागडे

विकासकांमुळे झोपडपट्टी वासियांची होणारी उपेक्षा आणि दुर्दशेबाबत उच्च न्यायालयाने शुक्रवारी चिंता व्यक्त केली. तसेच, आंतरराष्ट्रीय शहर आणि देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्याचा दृष्टीकोन बाळगण्याची गरज बोलून दाखवली. त्यासाठी, झोपडपट्टी पुनर्वसन कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक असून हा दृष्टीकोन प्रत्यक्षात आणण्यास मदतच करेल, असेही न्यायालयाने म्हटले.

कायद्याच्या तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करणे सरकारवर अवलंबून आहे, परंतु, विकासकाच्या दयेवर या झोपडीधारकांना सोडून दिले जाते. किंबहुना, झोपडीधारक हे वेळेत काम न करणाऱ्या आणि हितसंबंधांचा अधिक विचार करणाऱ्या विकसकांचे बळी ठरतात. याहून दुर्दैवी म्हणजे झोपडीधारकांच्या या परिस्थितीकडे सरकार आणि झोपु प्राधिकरण (एसआरए) डोळेझाक करते, असे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या विशेष खंडपीठाने सुनावले. तसेच, झोपु प्रकल्पांना होणारा विलंब आणि कामाच्या गुणवत्तेबाबतही चिंता व्यक्त केली. झोपडीधारक आहे म्हणून त्यांना विकासकाच्या दयेवर सोडून दिले जाऊ शकत नाही. उलट, झोपडीधारकांची परवड रोखण्यासाठी तसेच वेगवान आणि गुणात्मक विकास सुनिश्चित करण्यासाठी विकासकांना काही प्रमाणात जबाबदार धरणे आवश्यक आहे, असे खंडपीठाने म्हटले.

विकसकाची नेमणूक केली जाते. परंतु, प्रकल्प पुढे जातच नाही ही परिस्थिती असू नये. हा झोपु कायद्याचा हेतूही नाही. एक मजबूत आणि व्यावसायिक विकास असायला हवा, असेही विशेष खंडपीठाने उपरोक्त बाबी स्पष्ट करताना म्हटले. पुनर्विकास प्रकल्पातील कामाच्या दर्जावरही न्यायालयाने यावेळी प्रश्न उपस्थित केला व हे काम उच्च दर्जाचे असायला हवे, असे मत व्यक्त केले. अन्यथा, बांधकामानंतर पुढील दहा वर्षात



इमारतीचा पुनर्विकास करावा लागेल किंवा इमारत देखभालीविना मोडकळीस येईल, अशी शक्यता न्यायालयाने व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, मंजुरी आणि पुनर्विकास) कायद्याचा फेरआढावा घेण्यासाठी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी न्यायमूर्ती कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाची स्थापना केली. त्यानुसार, न्यायमूर्ती कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर शुक्रवारी या प्रकरणाची पहिली सुनावणी पार पडली. गरिबांसाठी करण्यात आलेल्या झोपु कायद्यात अनेक अडथळे आहेत. शिवाय, झोपु प्रकल्पाशी संबंधित १६०० हून अधिक प्रकरणे उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती.

न्यायमूर्ती कुलकर्णी यांच्या खंडपीठाने शुक्रवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी याच मुद्द्यावर जोर दिला. तसेच, शाश्वत विकासाची गरज असल्यावर जोर दिला. सध्याची स्थिती लक्षात घेता पुढील शंभर वर्षातही बहुमजली टॉवर उभे राहणार का, शहराचे काँक्रिटच्या जंगलात रुपांतर होणार का, मोकळ्या जागांची आवश्यकता नाही का, अशी प्रश्नांची सरबत्ती करून भावी पिढीचा थोडा विचार करा, असे न्यायालयाने म्हटले. लंडन आणि परदेशातील अन्य शहरांची उदाहरणे आपण उद्धृत करतो. पण तेथे मोठ्या प्रमाणात मोकळ्या जागा उपलब्ध करण्यावर भर दिला जातो. त्या ठिकाणी एक वीटसुद्धा ठेवण्यास परवानगी दिली जात नाही हे विसरतो. त्यामुळे, आपणही मोकळ्या जागा नसलेले काँक्रिटचे जंगल निर्माण करणे थांबवले पाहिजे, असे न्यायालयाने अधोरेखीत केली.

## महाराष्ट्रालाही न्याय मिळावा; सुप्रिया सुळे यांची अपेक्षा

■ मुंबई : नितीन देवळेकर

विकास व निधीसंदर्भात केंद्राकडून इतर राज्यांना मिळणारा न्याय महाराष्ट्रालासुद्धा मिळावा, अशी अपेक्षा राष्ट्रवादी शरद



पवार गटाच्या कार्याध्यक्ष व खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. सुळे यांच्या हस्ते पक्षाच्या प्रदेश कार्यालयात ध्वजवंदन करण्यात आले. राज्यात होत असलेल्या चुकीच्या गोष्टीविरोधात आवाज उठवा, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

गेल्या वर्षापासून आपण संघर्ष करत आहोत. शेवटी सत्याचा विजय होणार आहे. महाराष्ट्राने लोकसभा निवडणुकीत मोठे यश दिले आहे. पण, यशाबरोबर जबाबदारीही आलेली आहे. प्रत्येकाने आपल्या जबाबदारीचे पालन करायला हवे. दिल्लीसमोर महाराष्ट्र कधी झुकला नाही, यापुढे झुकणार नाही, असे सुळे म्हणाल्या. पुढचा काळही संघर्षाचा आहे. महागाई, बेरोजगारी महाराष्ट्रात कमी होताना दिसत नाही. महिलांवरचे अत्याचार वाढत आहेत. जे कार्यकर्ते भेटतात ते त्यांच्या मतदारसंघातील बेरोजगारीचा प्रश्न सांगत असतात. दुसऱ्या राज्याचे भले होत आहे, पण महाराष्ट्रातील तरुणांनासुद्धा रोजगारासंदर्भात न्याय मिळाला पाहिजे, अशी मागणी सुळे यांनी केली.

## ‘मेट्रो’च्या एका झाडासाठी ४१ हजार खर्च

■ मुंबई : सम्यक कासारे

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) ‘कुलाबा – वांद्रे – सीप्झ मेट्रो ३’ मार्गिकेतील स्थानकांच्या परिसरात २ हजार ९३१ झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. या वृक्ष लागवडीसाठी १२ कोटी १ लाख ६६ हजार १३६ रुपयांची तीन कंत्राटे देण्यात आली आहेत. या आकडेवारीनुसार एका झाडामागे ४१ हजार रुपये खर्च येणार आहे.



‘मेट्रो ३’ मार्गिकेच्या कामासाठी ३३.५ किमीच्या परिसरातील झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करावी लागली होती. हे प्रकरण न्यायालयात गेले होते. महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने ३,७७२ झाडे हटविण्यास परवानगी दिली होती. मात्र प्रत्यक्षात ३,०९३ झाडेच हटविली असून ६७९ झाडे वाचविण्यात यश आल्याची माहिती एमएमआरसीएलकडून देण्यात आली. तसेच न्यायालयात एमएमआरसीएलने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे पालन करत वृक्षारोपण करण्यात येत असल्याचे एमएमआरसीएलचे म्हणणे आहे. वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत ‘मेट्रो ३’वरील स्थानकांच्या परिसरात २९३१ झाडे लावली जाणार आहेत. त्यासाठी तीन कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकूण १२ कोटी १ लाख ६६ हजार १३६ रुपयांची तीन कंत्राटे देण्यात आली आहेत. काही दिवसांपूर्वी या वृक्षारोपणासाठी अवाच्या सवा खर्च केल्याची चर्चा रंगली होती. मात्र ही चर्चा निराधार असून एका झाडामागे ४१ हजार रुपये खर्च येत असल्याची एमएमआरसीएलने स्पष्ट केले आहे. पहिल्या टप्प्यात रोपवाटिकांमध्ये दोन हेक्टर क्षेत्रात निर्धारित कालावधीत ४६ सेंमी परिघापर्यंत झाडांची वाढ केली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात रोपवाटिकांमधून झाडांचे मुंबईतील विशिष्ट ठिकाणी स्थलांतर करून स्थानक परिसरात रोपण केले जाईल. तिसऱ्या टप्प्यात वृक्षारोपणानंतर तीन वर्षे झाडांच्या देखभालीची जबाबदारी कंत्राटदारावर असेल. एखादे झाड मृत पावल्यास बदल्यात नवे झाड कंत्राटदाराला लावावे लागेल.

## शरद पवारांशी हातमिळवणी बाबत अजित पवारांचे मौन

■ मुंबई : गणेश बागडे

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी आपली कोणतीही स्पर्धा नाही. ते त्यांच्या पक्षाचा प्रचार करीत आहेत तर आम्ही महायुतीच्या विजयासाठी प्रयत्न करीत आहोत, असे स्पष्ट करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवारांबरोबर पुन्हा हातमिळवणी करणार का, या प्रश्नावर मौन बाळगत थेट उत्तर देण्याचे टाळले.

अजित पवार किंवा पक्ष सोडून गेलेल्या अन्य नेत्यांना पक्षात परत प्रवेश देण्याचा निर्णय हा माझ्या आव्हानत्मक काळात साथ दिली त्यांच्याशी सल्लामसलत करून घेतला जाईल, असे शरद पवार यांनी मध्यंतरी विधान केले होते. त्या पार्श्वभूमीवर ‘ए.एन.आय.’ या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत अजित पवार यांनी शरद पवारांबरोबर पुन्हा जाण्याच्या प्रश्नावर थेट उत्तर देण्याचे टाळले. ते म्हणाले, मी महायुतीचा घटक पक्ष म्हणून निवडणूक लढत आहे. शरद पवार यांच्याबद्दल आम्हाला आदरच आहे. गेली ६२ वर्षे ते राजकारणात सक्रिय आहेत. भविष्यातही आम्ही



त्यांचा आदर राखू. दोन पिढ्यांनी पवारांचे राजकारण बघितले आहे. शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या राजकारणाची कार्यपद्धती वेगळी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महायुतीचा घटक पक्ष म्हणून लढत असून, महायुती पुन्हा सत्तेत येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री कोण होईल या प्रश्नावर निवडून आल्यावर सर्व आमदार एकत्र बसून नेता निवडतील, असे उत्तर अजित पवार यांनी दिले. मुख्यमंत्री महायुतीचाच होईल, असा दावा त्यांनी केला. शरद पवार हे त्यांच्या पक्षाच्या प्रचाराची बाजू सांभाळत आहेत. १९९९ मध्ये राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून मी पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत होतो. यामुळे मला पक्षाची कार्यपद्धती चांगलीच अवगत आहे. आमचे मार्ग आता वेगळे आहेत. महायुतीच्या माध्यमातून आम्ही लोकांचा विश्वास संपादन केला आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीच्या खोट्या कथानकावर विश्वास ठेवून लोकांनी मते दिली होती. पण विधानसभा निवडणुकीत लोक ती चूक करणार नाहीत. महायुती सरकारने अर्थसंकल्पात लोकहिताच्या अनेक योजना मांडल्या आहेत. काम करणारे कोण हे लोकांना चांगले समजते. यामुळे कोणी कितीही दावे केले तरीही महायुतीच पुन्हा सत्तेत येईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. बारामती मतदारसंघातून पत्नी सुनेत्राला उभे करण्यात माझी चूक झाली याची कबुलीही अजित पवार यांनी पुन्हा दिली. सुनेत्रा यांच्या उमेदवारीवरून केलेल्या विधानाने महायुतीत नाराजी पसरली हा सारा भ्रम आहे. मला कोणीही या बद्दल विचारलेले नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. महायुतीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. मी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकत्र बसून सारे निर्णय घेतो.

## मुंबई पोलीस दलात सप्टेंबरमध्ये सात हजारांहून अधिक कर्मचारी सेवेत

■ मुंबई : यश सावंत

**राज्याच्या इतिहासातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या पोलीस भरतीत निवड झालेले सुमारे आठ हजार पोलिसांचे प्रशिक्षण ३१ ऑगस्टला पूर्ण होत आहे. त्यातील सात हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी मुंबईतील असल्यामुळे सप्टेंबर महिन्यात ते मुंबई पोलीस दलात सामील होणार आहेत. त्यामुळे मुंबई पोलीस दलातील अपुऱ्या संख्याबळाचा प्रश्न बहुतांशी सुटणार आहे.**

करोनामुळे सर्वत्र टाळेबंदी असल्यामुळे सुमारे तीन वर्ष पोलीस भरती झाली नव्हती. तसेच मिरा-भाईंदर व पिंपरी-चिंचवड ही आयुक्तालये वाढल्यामुळे २०२२ मध्ये राज्य पोलीस दलात १८ हजार ३३१ पदांसाठी भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यात मुंबई पोलीस दलात सर्वाधिक म्हणजे सुमारे ८,०७६ पदांसाठी भरती झाली होती. त्यासाठी सात लाखांहून उमेदवारांनी अर्ज केले होते. गेल्यावर्षी झालेल्या या भरती प्रक्रियेत दोन लाखांपेक्षा अधिक उमेदवार मैदानी चाचणीत यशस्वी झाले होते. त्यानंतर लेखी परीक्षेनंतर निवड झालेल्या सर्वांना प्रशिक्षणासाठी राज्यातील विविध प्रशिक्षण केंद्रांत पाठवण्यात आले होते. ते प्रशिक्षण पूर्ण करून सर्व तरुण सप्टेंबर महिन्यात मुंबई पोलीस दलात दाखल होणार आहेत. राज्यातील मरोळ, खंडाळा, दौंड, सांगली, सोलापूर, लातूर, जालना, धुळे, अकोला व नागपूर या १० प्रशिक्षण केंद्रांवर सुमारे आठ हजारांहून अधिक नव्याने भरती झालेल्या पोलिसांचे प्रशिक्षण



सुरू असून ३१ ऑगस्टला ते संपणार आहे. त्यातील बहुतांश पोलीस मुंबई पोलीस दलातील असल्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक(प्रशिक्षण व खास पथके) राजकुमार व्हटकर यांनी सांगितले. राज्यातील १० प्रशिक्षण केंद्रांवर प्रशिक्षण घेणारे आठ हजारांहून अधिक पोलीस प्रशिक्षण अंतिम टप्प्यात आहे. त्यात सर्वाधिक म्हणजे सात हजारांहून अधिक पोलीस मुंबई पोलीस दलातील आहेत. त्या व्यतिरिक्त पुण्यातील २५० पोलिसांचा समावेश आहेत. मुंबई पोलीस दलात नवे कर्मचारी सामील होणार असल्याने अपुऱ्या संख्याबळाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पोलिसांचे संख्याबळ वाढण्याची ही इतिहासातील पहिलीच वेळ आहे. विशेष म्हणजे त्यात पोलीस शिपाई व पोलीस चालक या पदांचा समावेश आहे. मुंबई पोलीस दलात गेल्या काही वर्षांमध्ये पोलीस चालक पदाचा मोठ्या प्रमाणात तुटवडा आहे.

## मतदार यादीसोबत मतदारांचा मोबाइल क्रमांक जोडणार, ‘या’ तारखेपर्यंत नव मतदारांना अद्ययावतीकरण करता येणार

■ मुंबई : नितीन देवळेकर

विधानसभेची निवडणूक कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता असून मतदार यादी अद्ययावत करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या कार्यक्रमाअंतर्गत पात्र नव मतदारांना आपल्या नावाची नोंदणी करता येणार आहे. तसेच आधीच मतदार असलेल्यांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलामध्ये बदल, दुरुस्त्या, अद्यायावतीकरण करण्याची संधी उपलब्ध करण्यात आली आहे. यावेळी मतदारांनी मतदार यादीतील आपल्या नावासोबतच स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक देखील जोडण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षित पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. यात मतदारांसाठी दावे आणि हरकतींसाठी २० ऑगस्ट २०२४ पर्यंतचा कालावधी निश्चित केला आहे. मतदार यादीतील नावाबाबतची माहिती अद्ययावत करण्याबरोबरच यंदा मोबाइल क्रमांक जोडण्याची सुविधाही उपलब्ध करण्यात आली आहे. मतदार यादीतील नावासोबत मोबाइल क्रमांक जोडल्याने निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या विविध सूचना आणि माहिती नागरिकांना आपल्या मोबाईलवर मिळणे शक्य होणार आहे. आपला मोबाइल क्रमांक अद्यायावत केल्यास निवडणूक आयोगाच्या electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळाद्वारे, तसेच Voter Helpline मोबाइल ॲपद्वारे मतदार यादीतील आपल्या नावाचा सुलभतेने शोध घेता येतो. ई – मतदार ओळखपत्र डाऊनलोड करता येते. पूर्वी मतदार नोंदणी व इतर सेवा ऑफलाईन स्वरुपाच्या होत्या. त्यामुळे बहुतांश मतदार ओळखपत्रधारकाचे मोबाइल क्रमांक जोडलेले नाहीत. त्यामुळे मोबाइल क्रमांक जोडण्याची आवश्यकता आहे.

## सागरी किनारा मार्गाच्या लोकार्पणासाठी डिसेंबरचा मुहूर्त

■ मुंबई : सम्यक कासारे

**मुंबई महानगरपालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला सागरी किनारा मार्ग डिसेंबरमध्ये पूर्णतः सुरू होऊ शकणार आहे. सागरी किनारा मार्गाचे अंतिम टोक वांद्रे वरळी सागरी सेतूला जोडण्याचा टप्पा अद्याप बाकी असून त्यानंतरच हा प्रकल्प पूर्णपणे वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. डिसेंबरनंतरच मरीन ड्राईव्हहून थेट उपनगरात जाता येणार आहे.**



धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पाचे ९१ टक्के काम पूर्ण झाले आहे. मरीन ड्राईव्ह ते वांद्रे वरळी सागरी सेतूपर्यंत हा मार्ग तयार करण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत टप्प्याटप्प्याने मार्गिकांचे लोकार्पण करण्यात आले आहे. बिंदू माधव ठाकरे चौक ते प्रिन्सेस स्ट्रीटपर्यंत दक्षिण वाहिनी मार्गिका १२ मार्च २०२४ पासून वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. मरीन ड्राइव्ह ते हाजीअली उत्तर वाहिनी मार्गिका १० जूनपासून अंशतः खुली करण्यात आली. तसेच हाजी अली ते खान अब्दुल गफार खान मार्गपर्यंत उत्तर दिशेने जाणाऱ्या साधारण ३.५ कि. मी. मार्गिकेचे काम पूर्ण झाले असल्याने ती नागरिकांच्या सोयीकरिता तात्पुरत्या स्वरुपात ११ जुलैपासून खुली करण्यात आली आहे. मात्र मरीन ड्राईव्ह ते वांद्रे वरळी सेतूपर्यंतचा पूर्ण मार्ग सुरू करण्यासाठी डिसेंबर २०२४ चे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी नुकतीच याबाबतची घोषणा केली.

सागरी किनारा मार्ग पुढे वांद्रे – वरळी सागरी सेतूला जोडण्यात येणार आहे. हा प्रकल्प वांद्रे – वरळी सागरी सेतूला जोडण्यासाठी दोन तुळई (बो स्ट्रींग आर्च स्ट्रिंग गर्डर) यशस्वीपणे स्थापन केल्यानंतर दोन्ही मार्गिकांच्या कामांना वेग देण्यात आला आहे. मात्र सागरी किनारा मार्ग आणि वांद्रे वरळी सागरी सेतूला जोडणाऱ्या पुलाची कामे अद्याप बाकी असल्यामुळे वाहनचालकांना अजून प्रतीक्षा करावी लागणार आहे. प्रकल्पातील आंतरमार्गिका, रस्ते, सागरी पदपथ आदी कामे अंतिम टप्प्यात आहेत.

मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातंर्गत निर्माण होणाऱ्या १११ हेक्टर जागेपैकी सुमारे ७० हेक्टर जागा हरित क्षेत्राकरिता उपलब्ध होणार आहे. या जागेमध्ये लँडस्केपिंग, उद्यान, सायकल मार्गिका, मनोरंजन क्षेत्र, खुले प्रेक्षागृह, पदपथ इत्यादी सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. या कामाकरिता सल्लागारांची नेमणूक करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत निविदा तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. तसेच या क्षेत्रालगत असलेले महालक्ष्मी रेसकोर्सचे अंदाजे ४८ हेक्टर क्षेत्र महानगरपालिकेस सेंट्रल पार्क विकसित करण्याकरिता प्राप्त झाले आहे. या कामाकरिता वास्तुविशारदांची नेमणूक करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.**

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in ☎ ४९३६४०४/२४९३१९०२,फॅक्स २४९३१९०१
जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/ ४०५२ दिनांक :- १३/०८/२०२४

**निविदा सुचना ०६ (सहा) (सन २०२४-२५)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता “बी-१” नमुन्यातील निविदा मागवित आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| १ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ७६, ७७ व ७८ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.३६ |
| २ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ७९, ८०, ८१ व ८२ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ८.२१ |
| ३ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ८३, ८४ व ८५ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.५३ |
| ४ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ८६, ८७ व ८८ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.५४ |
| ५ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ८९, ९० व ९१ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.५१ |
| ६ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ९२,९३ व ९४ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.५२ |
| ७ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ९५, ९६ व ९७ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.५४ |
| ८ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ८३ ते ८७ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७२ |
| ९ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ८८ ते ९२ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७५ |
| १० | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ९३ ते ९७ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७३ |
| ११ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ९८ ते १०२ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७३ |
| १२ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. १०३, १०५ ते १०७ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ५.०६ |
| १३ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ११० ते ११२ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ४.०५ |
| १४ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ११३ ते ११७ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ५.४० |
| १५ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ११८ ते १२१ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ४.५५ |
| १६ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ८३ ते १०३, १०५, १०६, १०७, ११० ते १२१ येथे पावसाळ्यापुर्वीची झाडे गटर लाईन साफ करणे . | ८.४० |
| १७ | नायगाव येथील बी.डी.डी. चाळ क्र. अ- १ ते अ-५ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७४ |
| १८ | नायगाव येथील बी.डी.डी. चाळ क्र. अ- ६ ते अ-१० येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७३ |
| १९ | नायगाव येथील बी.डी.डी. चाळ क्र. अ- ११ ते अ-१५ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७३ |
| २० | नायगाव येथील बी.डी.डी. चाळ क्र. अ-१६ ते अ-१९ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७२ |
| २१ | नायगाव येथील बी.डी.डी. चाळ क्र. ब-१ ते ब-४ व ब-६ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७४ |
| २२ | नायगाव येथील बी.डी.डी. चाळ क्र. ब-७ ते ब-९ व ब-११ येथे पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे करणे. | ६.७२ |
| २३ | नायगाव येथील बी.डी.डी. चाळ क्र. अ-१ ते अ-१९, ब- १ ते ब-११ येथे पावसाळ्यापुर्वीची झाडे गटर लाईन साफ करणे . | ७.१७ |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दि.१९/०८/२०२४, सकाळी १५.०० पासून ते दि.२६/०८/२०२४ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दि.२७/०८/२०२४ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई |

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/२०८२

# उत्सवादरम्यान लेझर आणि कर्णकर्कश डीजेच्या वापरास आव्हान, उच्च न्यायालयात जनहित याचिका

**मुंबई : सम्यक कासारे**

सण आणि उत्सवांत मिरवणुकीसह इतर समारंभासाठी प्रखर दिव्यांचा वापर (लेझर बीम), कर्णकर्कश डिजेचा सर्रास वापर करण्याला उच्च न्यायालयात जनहित याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. उत्सवांतील लेझर बीम आणि डीजेच्या वापरामुळे अनेकांची दृष्टी आणि श्रवण क्षमतेवर परिणाम झाला असून काहींना कायमची दृष्टी गमवावी लागली आहे. त्यामुळे, लेझर बीम आणि डिजेच्या वापराबाबात योग्य आदेश द्यावेत, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.



अखिल भारतीय ग्राहक पंचायतने दाखल केलेल्या या जनहित याचिकेची मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने गंभीर दखल घेतली. तसेच, उत्सवादरम्यान ध्वनी प्रदुषणाच्या नियमावलींचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होत असल्याचे याचिकाकर्त्यांनी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आणून द्यावे अथवा त्याबाबत माहितीचा समावेश असलेले निवेदन सादर करावे, असे आदेश न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिले. त्यानंतर, दोन्ही प्रदुषण नियंत्रण मंडळांनी त्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करावी व उपाययोजना कराव्यात, असे आदेश दिले. तत्पूर्वी, सणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या घातक लेझर बीममुळे अनेकांची दृष्टी गेली आहे. शिवाय, डीजे आणि तत्सम उपकरणांमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदुषणामुळे अनेकांची श्रवणशक्ती कमी झाली आहे. डीजे वाजवला जात असताना अनेकांच्या हृदयाचे ठोके वाढल्याचे प्रकारही घडले आहेत. डीजेमुळे निर्माण होणाऱ्या अतितीव्र ध्वनी लहरींमुळे आसपासच्या इमारतींमध्ये कंपने निर्माण होत असल्याचे याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील सत्येंद्र मुळ्ये यांनी न्यायालयाला सांगितले.

# पेंग्विनच्या देखभालीचा खर्च वाढला, देखभाल खर्चासाठी २० कोटींची निविदा

**मुंबई : यश सावंत**

भायखळा येथील राणीच्या बागेतील अर्थात वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणीसंग्रहालयातील पेंग्विन पक्षांच्या देखभालीचा खर्च यंदा आणखी वाढला आहे. या कक्षातील पेंग्विनची संख्या गेल्या सहा वर्षात सात वरून अठरावर गेली आहे. पेंग्विनच्या वाढत्या संख्येबरोबरच खर्चही वाढला असून यंदा तब्बल २० कोटी अंदाजित खर्चासाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. मुंबईच्या राणीबागेत २०१७ मध्ये दक्षिण आफ्रिकेतून ८ हंबोल्ड पेंग्विन आणण्यात आले. त्यामधील एका पेंग्विनचा त्याच वेळी मृत्यू झाला. त्यानंतर सात पेंग्विन या कक्षात होते. मग या पेंग्विनच्या जोड्यांना पिल्ले झाली आणि त्याचाही प्राणीसंग्रहालयाने उत्सव केला. या पेंग्विनच्या पिल्लांचे नामकरणही प्राणीसंग्रहालयाने केला. पेंग्विनची संख्या गेल्या सहा वर्षात वाढून तब्बल १८ वर गेली आहे. यात दहा मादी आणि आठ नर यांचा समावेश आहे. पेंग्विनची संख्या वाढण्याबरोबरच पेंग्विनच्या देखभालीचा खर्चही यंदा वाढला आहे. प्राणीसंग्रहायल व्यवस्थापनाने पेंग्विनच्या देखभालीसाठी तीन वर्षाकरीता निविदा मागवल्या आहेत. तीन वर्षासाठीचा अंदाजित खर्च २० कोटी १७ लाखांवर आहे. तीन वर्षापूर्वी प्राणीसंग्रहालय व्यवस्थापनाने जेव्हा निविदा मागवल्या होत्या तेव्हा त्याचा खर्च १५ कोटी होता.



पेंग्विन कक्षामध्ये ठराविक तापमान राखावे लागत असल्यामुळे विशेष वातानुकुलित कक्ष आणि पेंग्विनसाठीचे अधिवास तयार केलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या देखभालीचा खर्च जास्त आहे. त्यातच पेंग्विनसाठी डॉक्टर, कक्षासाठी अभियंते आणि तंत्रज्ञ यांची सेवा २४ तास तीन पाळ्यांमध्ये द्यावी लागते. तसेच पेंग्विनना खाद्यपुरवठा असा सगळा खर्च यात समाविष्ट असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तसेच कंत्राटात दर तीन वर्षांनी १० टक्के वाढ होत असते त्यामुळे हा खर्च वाढल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, हे पेंग्विन देऊन गुजरातमधून सिंह आणण्याची योजनाही प्राणी संग्रहालयाने आखली होती. त्याकरीता प्रस्तावही पाठवला होता. मात्र गुजरातमधील जुनागढ येथील साकरबाग प्राणी संग्रहालयाकडे पेंग्विन ठेवण्याची व्यवस्थाच नसल्यामुळे त्यांनी पालिकेच्या प्रस्तावाला काहीही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे १८ पेंग्विनची देखभाल महापालिका करीत आहे.

# अजित पवार यांचं संजय राऊतांना उत्तर, 'आई बापाने जन्म दिलाय म्हणून उचलली जीभ..'

**मुंबई : नितीन देवळेकर**

सरडा आणि ढेकूण म्हणून राज्याचा कायापालट होणार आहे का? असा सवाल विरोधक विचारत आहेत. त्याचप्रमाणे अजित पवारांनी गुलाबी रंगाची जी थीम घेतली आहे त्यावरुन विचारलं असता सरडा रंग बदलतो अशी टीका केली. आता पुण्यातल्या जनसन्मान यात्रेत अजित पवारांनी संजय राऊतांसह विरोधकांना उत्तर दिलं. जनसन्मान यात्रेत गुलाबी रंगच का? असं विचारलं असता अजित पवार म्हणाले, 'मला गुलाबी रंग आवडला म्हणून आम्ही निवडला. अमुक एक रंग निवडला म्हणून जर मतं मिळाली असती तर रोज वेगवेगळे रंग निवडले असते. पुरुषांना काय आवडतं? तो रंग वापरु वगैरे असं निवडलं असतं. आम्ही एक थीम निवडली आहे त्या अंतर्गत गुलाबी रंग निवडलाय इतकंच कारण आहे. आमच्या मनात रंग आला त्यामुळे नाही. आता या रंगाची चर्चा होते. अजित पवार या कलरचं जॅकेट का होतं? चर्चा होते. जांभळ्याच्या आतला जो रंग असतो तो रंग आम्ही



घेतला आहे.' सुप्रिया सुळे ही महाराष्ट्राची लाडकी बहीण आहे. पण त्यांच्या लाडक्या भावांनी रंग बदलला आता 'पिंक' झाले आहेत. सरडा रंग बदलतो अचानक ते गुलाबी झाले. आता हा 'पिंक' सरडा बारामती सोडणार आहे पण ते कुठे जाणार आहे हे माहीत नाही. पण एक सांगतो गुलाबी रंग हा महाराष्ट्राला धार्जीणा नाही. आपला रंग भगवाच आहे. केसीआर यांचा पिंक रंग होता त्यांना सुद्धा आम्ही बोललो पिंक नही चलेंगाष्ठ एक तर भगवा चालेल नाहीतर तिरंगा चालेल. भगवा रंगच तिरंग्याला वाचवेल, असे बाळासाहेब म्हणायचे, हे उदाहरण संजय राऊत यांनी दिलं. अजित पवार म्हणाले, कोण आम्हाला शिव्या देतं आहे, कोण शाप देतं आहे? कोण कुणाला सरडा, ढेकूण म्हणतं आहे? मात्र यामुळे राज्याचे प्रश्न सुटणार आहेत का? राज्याचा कायापालट होणार आहेत का? याचं उत्तर विरोधकांनी दिलं पाहिजे. उगाच आई बापाने जन्माला घातलं म्हणून उचलली जीभ लावली टाळ्याला हे चालतं का? आज जनता सूज्ञ आहे असं अजित पवार म्हणाले.

# मुंबईत 'रेलनीर'चा पुरवठा बंद; अंबरनाथच्या ग्रामस्थांचे आयआरसीटीसी, ठेकेदाराविरोधात आंदोलन

**मुंबई : प्रथमेश चव्हाण**

अंबरनाथ येथे आयआरसीटीसीद्वारे 'रेलनीर' बाटलीबंद पाण्याचा पुरवठा मध्य आणि पश्चिम रेल्वेवर केला जातो. मात्र, अंबरनाथ येथील काकोळे ग्रामस्थांकडून आयआरसीटीसी आणि परप्रांतीय ठेकेदाराविरोधात आंदोलन सुरू आहे. त्यामुळे रेलनीर बाटलीबंद पाण्याची पुरवठा व्यवस्था खंडित झाली आहे. आयआरसीटीसीने मुंबईतील




रेल्वे स्थानकांतील रेलनीरचा पुरवठा पुढील सूचनेपर्यंत बंद केला आहे. इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टूरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी)द्वारे 'रेलनीर' बाटलीबंद पाण्याचा पुरवठा मध्य, पश्चिम रेल्वे स्थानकात आणि मेल-एक्स्प्रेसमध्ये केला जातो. अंबरनाथ येथील 'रेलनीर'च्या कारखान्यातून बाटलीबंद पाणी पोहोचवण्याचे काम मालवाहतुकीद्वारे काकोळे ग्रामस्थ करत होते. मात्र, मे २०२४ पासून वाहतूक ठेकेदार मनोज खाद्यायान भांडार मुझ्झफरपूर याने मालवाहतुकीचा कारभार हाती घेतला. त्यामुळे १२ मालवाहतूकदार ग्रामस्थांची सेवा बंद झाली. तर, वाहतूक ठेकेदार भांडार यांनी ही सेवा मिलेनियम ग्रुप ऑफ कंपनीकडे दिली. परिणामी, काकोळे ग्रामस्थ आर्थिक कोंडीत सापडले आहेत. याबाबत आयआरसीटीसी, रेलनीर, वाहतूक ठेकेदार यांच्या विरोधात ग्रामस्थ उपोषणाला बसले आहेत. मध्य रेल्वेवरील सीएसएमटी ते कसारा/कर्जत, पश्चिम रेल्वेवरील चर्चगेट ते विरारपर्यंत सर्व रेल्वे स्थानकात, हार्बर मार्गावरील सर्व रेल्वे स्थानके, वापी आणि वलसाड स्थानकात 'रेलनीर'चा बाटलीबंद पाण्याचा पुरवठा बंद राहणार आहे. रेल्वे स्थानकात प्रवाशांनी पाण्यापासून वंचित राहू नये, यासाठी रेल्वेच्या प्रत्येक स्टॉलवर रेल्वेने नियुक्त केलेल्या खासगी कंपन्यांच्या बाटल्यांची विक्री केली जाईल.

'रेलनीर' बाटलीबंद पाण्याचा पुरवठा करण्यासाठी नवीन वाहतूक ठेकेदार नेमला. मात्र, मालवाहतुकीचे काम पुन्हा काकोळे ग्रामस्थांना मिळावे यासाठी त्यांनी आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे ग्रामस्थ आणि नवीन वाहतूक ठेकेदार यांच्या बाजू ऐकून मध्यम मार्ग काढला जाईल. मालवाहतूक खंडित झाल्याने पुढील दोन दिवस मुंबईतील रेल्वे स्थानकात ह्यहणरेलनीरहणहण बाटलीबंद पाण्याचा पुरवठा बंद राहील, असे आयआरसीटीसीकडून सांगण्यात आले.

# बनावट बांधकाम परवाना घोटाळ्यात चौघांवर फौजदारी कारवाई, सोलापूर महापालिकेतील गैरप्रकार

**सोलापूर : विशाल कारंडे**

सोलापूर महापालिकेत गेल्या वर्षी उजेडात आलेल्या बांधकाम परवाना घोटाळ्यातील एका उपअभियंत्यासह चौघांविरुद्ध अखेर फौजदारी कारवाई करण्यात आली आहे. बांधकाम परवाना ऑनलाईन स्वीकारण्याचे बंधन असताना ऑफलाईन पद्धतीने बेकायदेशीर बांधकाम परवाने देऊन महापालिकेची व संबंधित अर्जदारांची फसवणूक करण्याचा प्रकार घडला होता. झाकीर हुसेन अल्लाबक्ष नाईकवाडी (रा. ए स्केअर अपार्टमेंट, बसवेश्वर नगर, सोलापूर) या उपअभियंत्यासह श्रीकांत बसण्णा खानापुरे व आनंद वसंत क्षीरसागर हे दोघे अवेक्षक आणि शिवशंकर बळवंत घाटे या लिपिकाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हे चौघेही जण महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागात नेमणुकीस होते. यासंदर्भात बांधकाम परवाना विभागातील उपअभियंता नीलकंठ मठपती यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या दोन वर्षाच्या कालावधीत महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागात हा प्रकार घडला होता. एका मिळकतदाराने स्वतःच्या मिळकतीवर बांधकामासाठी महापालिकेकडे परवाना मागितला असता त्यातून बनावट बांधकाम



परवान्याचे प्रकरण चव्हाट्यावर आले होते. झाकीर हुसेन नाईकवाडी व इतरांना बांधकाम परवाना मंजूर करण्याचा कायदेशीर अधिकार नव्हता. तसेच बांधकाम परवाना ऑनलाईन पद्धतीने देण्याची पद्धत होती. परंतु नाईकवाडी याच्यासह अवेक्षक खानापुरे, क्षीरसागर आदींनी कायदा हातात घेऊन परस्पर ऑफलाईन पद्धतीने बांधकाम परवाने मंजूर करण्याची मालिका आरंभली होती. परंतु जेव्हा हे प्रकरण अंगलट येण्याची चाहूल लागताच संबंधित ९६ बांधकाम परवान्यांशी कागदपत्रांची परस्पर विल्हेवाट लावण्यात आली होती. त्यावेळी बांधकाम परवाना विभागात नगर अभियंता लक्ष्मण चलवादी नावाचा अधिकारी होता. त्याचीही सखोल चौकशी होणे अपेक्षित होते. त्याने याच पार्श्वभूमीवर पालिकेच्या सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली. दरम्यान, नाईकवाडी व इतर चौघांना सेवेतून निलंबित करण्यात येऊन त्यांची खातेनिहाय चौकशी सुरू झाली होती, त्यानंतर विलंबाने का होईना, या चौघाजणांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात आली. बांधकाम परवाना घोटाळा केवळ नाईकवाडी व इतर तिघाजणांपुरता मर्यादित नाही, तर त्यात इतर वरिष्ठांचाही हातभार लागलेला असावा, अशी प्रश्नार्थक चर्चा आजही महापालिका वर्तुळात होत आहे.

# मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ होणार; हजार-बाराशे मतदारांमागे एक मतदान केंद्र

**मुंबई : यश सावंत**

लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्राबाहेर लागलेल्या रांगा लक्षात घेऊन विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी मतदान केंद्रांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक मतदान केंद्रामध्ये (बूथ) पूर्वी असणारी सरासरी १५०० मतदारांची संख्या आता सरासरी १००० ते १२०० इतकी असेल. त्यामुळे मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ होणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतदानाचे प्रमाण व वेग वाढण्यास मदत होणार आहे. तसेच मतदारांची संख्या व परिसर यांचा ताळमेळ घालून मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात येणार आहे.

विधानसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सध्या राज्यात मतदार यादी अद्ययावत करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. मुंबईसाठी महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. त्यामुळे विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत मुंबई महानगरपालिका मुख्यालयात शुक्रवारी महापालिका आयुक्तांनी बैठक घेतली. मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा या दोन्ही जिल्ह्यांमध्ये मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या कार्यक्रमाची जनजागृती करण्यात आली आहे. त्यासोबत राजकीय पक्षांनीही आपापल्या परीने या कार्यक्रमाची माहिती



नागरिकांपर्यंत पोहोचवावी, जेणेकरुन मतदार नोंदणीचे पर्यायाने मतदानाचे प्रमाण वाढवण्यास मदत होईल, असे आवाहन भूषण गगराणी यांनी केले. जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या आढावा बैठकीमध्ये विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले होते. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, तसेच महानगरपालिकेचे सहआयुक्त (मध्यवर्ती खरेदी खाते) विजय बालमवार व संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. सध्या सुरू असलेला मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम २० ऑगस्टपर्यंत राबविण्यात येणार आहे. त्यानंतर ३० ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

नवमतदारांची नोंदणी, मतदारांच्या नावासमवेत मोबाइल क्रमांक जोडणे इत्यादी प्रक्रियांची माहिती या बैठकीत देण्यात आली. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी त्यावर आपापली मते व सूचना मांडल्या.

# औषध खरेदीची निविदा प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, झीरो प्रिस्क्रिप्शन योजना सप्टेंबरपासून सुरु करण्याचे आदेश



**मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये शून्य औषध चिठ्ठी योजना लागू करण्यासाठी औषध खरेदीशी संबंधित निविदा प्रक्रियेतील पडताळणी वेगाने पूर्ण करावी, यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ आणि अतिरिक्त संगणकांचा पुरवठा करावा, तसेच मोहीम स्वरूपात काम करून येत्या ६ सप्टेंबरपर्यंत पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी आणि कोणत्याही परिस्थितीत १५ सप्टेंबरपर्यंत कार्यादेश द्यावेत, असे सक्त निर्देश अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी मध्यवर्ती खरेदी खात्यासह रूग्णालय प्रशासनाला दिले आहेत.**

**मुंबई : यश सावंत**

त्यामुळे ही योजना सप्टेंबरपासून सुरू होण्याची शक्यता आहे. महानगरपालिका रूग्णालयामध्ये औषधोपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना आवश्यक असणारी औषधे बाहेरील दुकानांमधून खरेदी करावी लागू नयेत, यासाठी शून्य औषध चिठ्ठी योजना अर्थात 'झिरो प्रिस्कीप्शन धोरण' राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगरपालिका प्रशासनाला दिले होते. मात्र अद्याप ही योजना सुरू होऊ शकलेली नाही. आचारसंहिता, किचकट निविदा प्रक्रिया यामुळे ही योजना रखडली आहे. ही प्रक्रिया अधिक वेगाने होऊन नागरिकांना या धोरणाचा लाभ मिळावा, या उद्देशाने मुंबई महानगरपालिका प्रशासनाची एक महत्त्वपूर्ण बैठक बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी महानगरपालिका मुख्यालयात पार पडली.

शून्य औषध चिठ्ठी योजना महापालिकेची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे रूग्णांना महापालिकेच्या रूग्णालयातच मोफत औषधे उपलब्ध होणार आहेत. यासाठी मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत सुरू असलेल्या निविदा प्रक्रियेत विविध सूचीअंतर्गत निरनिराळी औषधे व वैद्यकीय बाबींची पडताळणी प्रक्रिया सध्या मध्यवर्ती खरेदी खाते आणि बा. य. ल नायर रूग्णालय यांच्यामार्फत सुरू आहे. ही प्रक्रिया अधिक वेगाने होण्यासाठी आवश्यक असणारे वरिष्ठ फार्मासिस्ट, फार्मासिस्ट आणि डेटा एंट्री ऑपरेटर आदी अतिरिक्त मनुष्यबळ व या अतिरिक्त मनुष्यबळाला आवश्यक असणारे अतिरिक्त संगणक तातडीने म्हणजे पुढच्याच दोन दिवसात उपलब्ध करून देण्याचे आदेश बांगर यांनी बैठकीदरम्यान सह आयुक्त (मध्यवर्ती खरेदी खाते) विजय बालमवार, उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) संजय कुऱ्हाडे, संचालक (वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रूग्णालये) डॉ. नीलम अंद्राडे यांना दिले.

सोमवार ते शनिवार दरम्यान मोहीम पद्धतीने अतिरिक्त मनुष्यबळ वापरून हे काम पूर्ण करावे आणि पथके नेमून कामांचा दररोज आढावा घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या सर्व कार्यवाहीसाठी तीन आठवड्यांची मुदत अतिरिक्त आयुक्तांनी दिली आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड (प), मुंबई-४०००८०
ई-मेल पत्ता :- elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रमांक :-०२२-२५६०१३२७
ई-निविदा सुचना क्र. ९८/२०२४-२५

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाकडील विद्युत ठेकेदार (लिफाफा क्र.१ अनुसार) यांचे कडून खालील कामाकरिता ब-१ टक्के वारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नांव : | निविदा रक्कम रूपये : |
|---|---|
| १. अंदाजपत्रक क्र. ओडब्ल्यु/एनएमईडी/एमईएसडी/एमएलडी/२४७१२/२०२४-२५ मुलुंड पोलीस स्टेशन (तळमजला +३) मुलुंड (प), मुंबई ८० येथे प्रस्तावित स्थापत्य कामाच्या अनुषंगाने निस्कळीत होणाऱ्या विद्युत संच मांडणीचे नूतनीकरण/दुरुस्ती करणे | रूपये ११६९३६९/- |
| २. अंदाजपत्रक क्र.अटळ/ एनएमईडी/एमएसएसडी/ओएमएस/२४०५५/२०२४-२५, जुने महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील वातानुकूलित यंत्रणा, जनित्र (५०० के व्ही ए), उद्वाहन, विद्युत उपकेंद्र(५०० के व्ही ए) चालविण्याकरीता आणि दैनंदिन देखभालीसाठी कुशल चालक व अकुशल मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने पुरविण्याकरीता | रूपये २७२७000 /- |
| ३. अंदाजपत्रक क्र.अटळ/ एनएमईडी/एमएसएसडी/एनएमएस/२४००१/२०२४-२५, नविन महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील वातानुकूलित यंत्रणा, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (१८० केलडी), जनित्र (२००० के व्ही ए), उद्वाहन, विद्युत उपकेंद्र(२००० के व्ही ए) चालविण्याकरीता आणि दैनंदिन देखभालीसाठी कुशल चालक व अकुशल मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने पुरविण्याकरीता | रूपये ४१२९९२0/- |
| ४. अंदाजपत्रक क्र.अटल/एईएसडी/केंडील/२३६७१/२०२३-२४ (सुधारित) गोरेगाव (पु), मुंबई येथील फोर्स वन आवारातील एकूण ११ नग उद्वाहांचे (प्रशासकीय इमारत तळमजला +5 वरचे माजले करिता एकूण १० प्रवाशी क्षमता 1 नग व निवासी इमारत तळमजला + ७ माजले करिता एकूण ८/१२/ प्रवाशी क्षमता -१० नग) यांचे सर्वंकष त्रैवार्षिक देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. (मागणी पावती) | रूपये ३१०४५०८/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.१३.०८.२०२४ ते दि.२१.०८.२०२४ रोजी १७.३०वा.पर्यंत.
ई निविदा उघडणे : दि.२३.०८.२०२४ रोजी १४.00 वा.नंतर.
(सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २२,/प्र.क्र १०४/इमा-२ मंत्रालय, मुंबई दि.२८.०६.२०२४)
डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१९३८
खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. वरील अंदाजित रक्कमेत जी.एस.टी. सामाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरताना जी.एस.टी.वगळून दर नमूद करावा.अंदाजित रक्कमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस.टी.१८% वेगळा अदा करण्यात येईल.
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)
३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफी केशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.
४. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड (प), मुंबई कार्यालयातील सूचना फलक.
जा.क्र.काअ/उमुंविवि/निविदा/ २९९६ /२०२४ दिनांक: ०७/०८/२०२४

सही
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, मुंबई.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# म्हाडाची बनावट वेबसाईट, ३०-३० लाख रुपयांमध्ये मुंबईत फ्लॅट, दोघांची सुरु केला फसवणुकीचा धंदा

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

मुंबई, पुण्यासारख्या शहरात आपले हक्काचे घर असावे, असे स्वप्न अनेक मध्यमवर्गीय पाहत असतात. त्या लोकांसाठी सरकारकडून म्हाडामार्फत (महाराष्ट्र आवास आणि क्षेत्र विकास प्राधिकरण) घरांची विक्री होत असते. म्हाडाचं घर घेण्याचं स्वप्न पाहत असाल.. त्यासाठी अर्ज भरत असाल तर सावधान व्हा... कारण म्हाडाच्या नावाखाली तुमची फसवणूक होऊ शकते.. तुम्हाला आर्थिक फटका बसू शकतो... म्हाडाच्या घराच्या शोधात असणाऱ्या लोकांची फसवणूक करण्याचा नवीन धंदा दोघांनी सुरु केला. त्यासाठी म्हाडासारखीच हुबेहुब वेबसाईट बनवली. घर घेणाऱ्या व्यक्तींना शोधून त्यांना त्या वेबसाईटमार्फत पेमेंट करण्याचे सांगितले जात होते. त्यासाठी दोघांपैकी एक जण म्हाडाचा अधिकारी बनला. अखेर मुंबई पोलिसांनी या प्रकरणाचा भांडाफोड केला. दोघांना अटक केली आहे. मुंबई पोलिसांच्या BKC सायबर क्राईम युनिटने म्हाडाच्या बनावट वेबसाईटचा भांडाफोड केला आहे. कल्पेश सेवक नावाच्या व्यक्तीने ओरिजनल वेबसाईटची कॉपी करुन दुसरी बेबसाईट बनवली. त्या माध्यमातून लोकांची फसवणूक सुरु केली. कल्पेश याने त्यासाठी अमोल पटेल याला सोबत घेतले. अमोल पटेल स्वत:ला म्हाडाचा अधिकारी म्हणत होता. तो एका फ्लॅटसाठी ३० लाख रुपये देण्याचे सांगत होता. फ्लॅटसुद्धा मुंबईतील गोरेगावमध्ये असल्याचे तो सांगत होता. हा प्रकार सायबर क्राईम विभागाने उघड केला. त्यानंतर कल्पेश सेवक याला माहीममधून तर पटेल याला नालासोपारा येथून अटक करण्यात आली. बनावट वेबसाईट mhada.org पटेल आणि सेवक यांनी केली. त्यानंतर ग्राहक शोधून त्यांना ऑनलाइन लिंक पाठवू लागले. त्यामाध्यमातून पेमेंट करण्याचे ते सांगत होते. ही बेबसाईट म्हाडाची ऑफिशियल वेबसाइट https://mhada.gov.in सारखीच दिसत होती. त्यामुळे युजरचा विश्वास बसत होता. म्हाडाकडून यासंदर्भात पोलिसांकडे तक्रार करण्यात आली. त्यानंतर आरोपींना पकडण्यात आले. पोलिसांनी अटक केल्यानंतर आरोपींनी बनावट वेबसाईटच्या माध्यमातून लोकांना फ्लॅट घेण्याचे सांगत असल्याचे मान्य केले. यासंदर्भात पोलिसांनी सांगितले की, गोरेगावमध्ये ३० लाख रुपयांमध्ये फ्लॅट देण्याचे आमिष आरोपी दाखवत होते. त्यासाठी बनावट वेबसाईटची लिंक पाठवत होते. अटक केल्यानंतर आता आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.





## हप्ता वसुली करणाऱ्या भाईला बेड्या; पोलिसी खाक्या दाखवताच हात जोडून मागितली माफी

**पिंपरी : विशेष प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवडच्या पिंपळे गुरव मध्ये पान टपरी वरून हप्ता वसुली करणाऱ्या भाईला सांगवी पोलिसांनी अटक केली आहे. हप्ता वसुलीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. अखेर या भाईला पोलिसांनी योग्य ती समज देत चक्क माफी मागायला लावली आहे. नकुल उर्फ नक्या गायकवाड असं या हप्ता वसुली करणाऱ्या गुन्हेगाराचे नाव आहे. या घटने प्रकरणी महेंद्र श्याम बहादुर प्रतापसिंह यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पिंपळे गुरव मध्ये हप्ता वसुली करणाऱ्या नक्या गायकवाडचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान वायरल झाला होता. यानंतर सांगवी पोलिसांनी काही वेळातच त्याला अटक केली. पान टपरी चालक महेंद्र हा त्याच्या पान टपरीवर दररोज प्रमाणे सकाळी येऊन व्यवसाय करत होता. तेव्हा, नक्या गायकवाड आणि त्याचा साथीदार त्या ठिकाणी आले. हप्त्याची मागणी करत आधी बरणीने मग, हाताने मारहाण करत शिवीगाळ केली. पिंपळे गुरव मध्ये माझं नाव कोणालाही विचार अशी धमकी देण्यात आली. हा सर्व व्हिडिओ नक्याच्या साथीदाराने मोबाईल मध्ये कैद केला. तो सोशल मीडियावर व्हायरल केला. अवघ्या काही तासातच या प्रकरणी सांगवी पोलिसांनी नक्या गायकवाडला अटक केली. सांगवी पोलिसांनी त्याची भाईगिरी उतरवली. हात जोडून माफी मागण्यास लावली. मी इथून पुढे काही करत नाही. तुम्ही करू नका अस आता गुन्हेगार नक्या सांगतो आहे. नक्या गायकवाड याच्यावर अल्पवयीन असताना खडकी पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांनी दिली आहे.





## नालासोपाऱ्यात दोन कोटींचे अमली पदार्थ जप्त; नायजेरियन महिलेला अटक

**वसई : विशेष प्रतिनिधी**

तुळींज पोलिसांनी एका नायजेरीयन महिलेला अटक केली असून तिच्याकडून दोन कोटी रुपयांचे मॅफेड्रॉन हे अमली पदार्थ जप्त केले आहे. नालासोपारा शहरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये अमली पदार्थांचा व्यवहार चालतो. एक नायजेरियन महिला अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती तुळींज पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मध्यरात्री नालासोपारा पूर्वेच्या प्रगती नगर येथील एसपी अपार्टमेंट येथे पोलिसांनी छापा टाकला. त्यावेळी या महिलेकडे सुमारे दोन कोटी रुपये किमतीचे मॅफेड्रॉन (एमडी) हे अमली पदार्थ आढळून आले. एडिका जोसेफ (३०) असे या महिलेचे नाव असून ती मूळची नायजेरियन देशाची नागरिक आहे. तिच्या व्हिजा ची मुदत संपली होती आणि ती भारतामध्ये बेकायदेशीररित्या राहत होती, असे तुळींज पोलिसांनी सांगितले. या महिलेला अटक केली असून तिच्या विरोधात गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५(एनडीपीएस ॲक्ट ) कलम ८ (क), २१ (क) सह विदेशी नागरिक कायदा १९४६ चे कलम १४(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## हॅलो , मी मिलिंद भारंबे बोलतोय... तोतया अधिकाऱ्याकडून वृद्धाला २० लाखांचा गंडा

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

मी आयपीएस अधिकारी मिलिंद भारंबे बोलतोय... मनी लॉड्रिंगच्या प्रकरणात तुमच्या आधार कार्डाचा वापर झाला आहे. तुम्हाला प्रकरण मिटवायचे असेल तर २० लाख रुपये द्या.., असे सांगत सायबर भामट्यांनी एका ८१ वर्षीय वृद्धाला गंडा घातल्याची घटना नवी मुंबईत घडली. धक्कादायक गोष्ट म्हणजे, या भामट्यांनी आयपीएस अधिकारी मिलिंद भारंबे, पोलिस उपायुक्त प्रदीप सावंत आणि नीरज कुमार यांच्यासारख्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या नावाचा वापर फसवणुकीसाठी केला. सर्वप्रथम सचिन पाटील या नावाने या भामट्याने वृद्धाला फोन केला. आपण आयपीएस अधिकारी आहोत आणि मनी लॉड्रिंगच्या प्रकरणात तुमच्या आधार कार्डाचा वापर झाल्याचे आपल्याला समजले आहे. याच पैशांतून अमली पदार्थांची देखील खरेदी-विक्री झाली आहे. त्यामुळे तुम्ही गुन्हेगार आहात, असे सांगत या वृद्धाला त्याने भीती घातली. या प्रकरणी तुम्हाला माझे वरिष्ठ पोलिस उपायुक्त प्रदीप सावंत यांच्याशी बोलावे लागेल, असे सांगत त्याने सावंत (तोतया अधिकारी) याच्याकडे फोन कॉल ट्रान्स्फर केला. त्याने देखील या वृद्धाला भीती दाखवत तुम्हाला आमचे वरिष्ठ अधिकारी मिलिंद भारंबे यांच्याशी बोलावे लागेल, असे सांगत भारंबे (तोतया अधिकारी) याच्याकडे फोन ट्रान्स्फर केला. भारंबे यांच्या नावाचा वापर करत बोलणाऱ्या या तोतया अधिकाऱ्याने या प्रकरणात तुम्ही निरपराध असल्याचे मला माहिती आहे. मात्र, थोडे पैसे दिले तर हे प्रकरण संपेल. असे सांगत त्याला २० लाख रुपये देण्यास सांगितले. भीतीपोटी या वृद्धाने ते पैसे दिले. मात्र, नंतर त्याला आपली फसवणूक झाल्याचे समजले. सायबर पोलिसांमध्ये या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## बांधकाम व्यावसायिकाने उभारलेल्या बेकायदा झोपड्यांवर कारवाई



**नवी मुंबई : विशेष प्रतिनिधी**

सीवूड्स विभागात पालिका व सिडकोच्या मोकळ्या जागेत शनिवारी सकाळी सीवूड्स रेल्वेस्थानक परिसरात सेक्टर २५ येथील पालिकेच्या मल:निसारण केंद्रजवळील भूखंडाभोवती हिरव्या जाळीचे कुंपण लावून बेकायदा झोपड्या उभारल्या जात होत्या. परंतु पालिकेच्या बेलापूर विभाग सहाय्यक आयुक्त यांना बेकायदा कामाबाबत माहिती देताच तात्काळ तोडक कारवाई करण्यात आली आहे.

पालिकेचा अतिक्रमण विभागही 'अलर्ट मोड'वर असून पालिकेने नुकतेच मुख्यालय स्तरावर केंद्रीय अतिक्रमण पथक स्थापन केले आहे. बांधकाम व्यावसायिकाकंडून मात्र मनमानी करण्यात येत असून सीवूड्स सेक्टर २५ येथे नवीन टॉवरचे काम सुरू असून याच ठिकाणी विकासकाकडून बेकायदा लेबर कॅम्प उभारण्यात येत असल्याने अतिक्रमण विभागाने या झोपड्यांवर कारवाई केली आहे. सीवूड्स सेक्टर २५ येथील एका बांधकाम व्यावसायिकाचे काम सुरु असून बांधकामाच्यासाठी लागणाऱ्या कामगारांसाठी लेबर कॅम्प बनवण्यात येत होता. पालिकेने तक्रार प्राप्त होताचा तात्काळ कारवाई करण्यात आली असून बेकायदा झोपड्यांवर कारवाई केली.

## वैद्यकीय उपचारांच्या हलगर्जीपणातून डोंबिवलीतील शिवाजीराव जोंधळे यांचा मृत्यू, गिता खरे यांच्यासह चार जणांवर गुन्हा दाखल

**कल्याण : विशेष प्रतिनिधी**

डोंबिवलीतील जोंधळे विद्यासमुहाचे अध्यक्ष दिवंगत शिवाजीराव जोंधळे यांना दोन वर्षापूर्वी यकृताचा कर्करोग झाला होता. त्यांना या आजारातून बाहेर काढण्यासाठी पुरेपुर वैद्यकीय उपचार होणे आवश्यक होते. परंतु, शिवाजीराव जोंधळे नियंत्रक असलेल्या विघ्नहर्ता ट्रस्टच्या सचिव गिता खरे (शिवाजीराव यांची दुसरी पत्नी) आणि त्यांचा खरे कुटुंबातील मुलगा, मुलगी, सून, जावई यांनी शिवाजीराव यांची मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशातून त्यांना वेळोवेळी त्रास देऊन वैद्यकीय उपचार घेण्यापासून वंचित ठेवले. शिवाजीराव यांच्यावर कर्करोग आजारातून बरे होण्यासाठी यकृताची प्रत्यारोपण शस्त्रक्रिया गिता खरे यांनी होऊन दिली नाही.

त्यामुळे आपल्या वडिलांच्या मृत्यूस गिता खरे कुटुंब कारणीभूत आहे. हा शिवाजीराव जोंधळे यांचा मुलगा सागर यांचा दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाने प्रथमदर्शनी मान्य करून गिता खरे यांच्यासह इतर आरोपींवर गुन्हा दाखल करून चौकशी करण्याचे आदेश विष्णुनगर पोलिसांना दिले.

कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाच्या जिल्हा न्यायदंडाधिकारी सायली लम्भाते यांच्या आदेशावरून डोंबिवलीतील विष्णुनगर पोलिसांनी सागर शिवाजीराव जोंधळे यांच्या तक्रारीवरून विघ्नहर्ता ट्रस्टच्या साचिव गिता खरे (शिवाजीराव यांची दुसरी पत्नी), वर्षा देशमुख (शिवाजीराव यांची मुलगी), प्रितम देशमुख (जावई), हर्षकुमार खरे (मुलगा), स्नेहा खरे (सून) यांच्या विरुध्द शनिवारी गुन्हा दाखल केला. न्यायालयाने खरे कुटुंबियांची बाजू ऐकून घेऊन हा आदेश दिला. मानसिक छळ करणे, निष्काळजीपणा, गुन्हेगारी कट रचणे या भारतीय न्याय संहिता कलमाने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी सांगितले, शिवाजीराव यांना कायदेशीर विवाहाच्या वैशाली पत्नीपासून चार अपत्ये होती. समर्थ समाज या शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद ते सांभाळत होते. या संस्थेत काही वर्षापूर्वी गिता खरे या शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. गिता खरे यांच्या बरोबर शिवाजीराव यांचे अनैतिक संबंध प्रस्थापित होऊन त्यांनी तिच्या बरोबर विवाह केला. त्यांना वर्षा खरे (देशमुख) हे अपत्य झाले. या प्रकाराने शिवाजीराव जोंधळे यांच्या कुटुंबीयांवर अन्याय झाला. शिवाजीराव यांनी स्वमिळकतीमधून आसनगावसह अनेक ठिकाणी जागा घेऊन तेथे शिक्षण संस्थेची उभारणी केली. गिता खरे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजीराव यांना ब्लॅकमेलिंग करून, जोंधळे कुटुंबीयांना अंधारात ठेऊन या सर्व मिळकती स्वत:च्या नावावर करून घेतल्या. या विषयावरून शिवाजीराव आणि मुलगा सागर यांच्यात कौटुंबिक वाद निर्माण झाले. जानेवारी २०२२ मध्ये शिवाजीराव यांना यकृताचा कर्करोग झाला. वितुष्ट दूर सारून मुलगा सागरने त्यांची काळजी घेण्यास सुरुवात केली. चेन्नई, मुंबई, डोंबिवलीतील रुग्णालयात शिवाजीराव यांच्यावर उपचार करण्यात आले.

## प्रेयसीच्या मुलीवर बलात्कार, फरार आरोपीला ४ वर्षांनी अटक

**वसई : विशेष प्रतिनिधी**

प्रेयसीच्या मुलीवर बलात्कार करून फरार झालेल्या आरोपीला गुन्हे शाखा ३ च्या पथकाने ४ वर्षांने हरिद्वार येथून अटक केली. नाव बदलून तो पोलिसांना गुंगारा देत होता. आरोपी अनिल बिडलान हा याचे नालासोपारा येथील एका महिलेशी प्रेमसंबध होते. या महिलेला पहिल्या पतीपासून १८ वर्षांची मुलगी आहे. बिडलान या महिलेच्या घरी ये-जा करत होता. २०२१ मध्ये पीडित मुलीची आई कामाला गेली होती. त्यावेळी आरोपी बिडलान तिच्या घरी गेला. त्याने तिला कामाच्या बहाण्याने एका निर्जन स्थळी नेले आणि तिच्यावर बलात्कार केला. या घटनेमुळे मुलीला प्रंचड मानसिक धक्का बसला होता. या प्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात बिडलान विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु तेव्हापासून तो फरार होता. आरोपी बिडलनाच्या प्रकरणाचा तपास मिरा भाईंदर वसई विरार पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. पोलिसांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण करून तपास सुरू केला. बिडलना हा उत्तराखंडच्या हरिद्वार येथे नाव बदलून रहात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी त्याला सापळा लावून अटक केली.




## आई मद्यधुंद अवस्थेत असताना पित्याकडून १३ वर्षांच्या मुलीवर अत्याचार

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

आई मद्यधुंद अवस्थेत असताना पित्याने १३ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार मुंबईत घडला. पीडित मुलीने हा प्रकार मावशीला सांगितल्यानंतर तिने पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी पीडित मुलीच्या वडिलांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मुंबईमधील पश्चिम उपनगरात कुटुंबासमवेत वास्तव्यास असलेल्या १३ वर्षांच्या मुलीवर वडिलांनीच २७ जुलै रोजी अत्याचार केला.

### बेवारस मृतदेह

समतानगर पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र. ५४/२०२४ कलम- १७४ फौ.दं.प्र.संहिता १९७३ अन्वये बेवारस लिंग-पुरुष, वय अंदाजे- ६० वर्षे, रंग- सावळा, बांधा- सडपातळ, दाढी-वाढलेली, उंची- अंदाजे ५ '५'इंच,, असलेला इसम समतानगर पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.



**संपर्क-**
**निकिता कोळपकर, पोलीस उपनिरीक्षक**
**समतानगर पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ८७८८९९३७०५**
**पोलीस ठाणे क्रमांक :**
**०२२२८८७६११९**

## मुंबईत महिला डॉक्टरला मारहाण, रक्ताने माखलेले कापसाचे बोळे फेकले आणि..; मद्यधुंद अवस्थेत रुग्णाचा राडा

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

मुंबईत एका महिला डॉक्टरला मारहाण करण्यात आल्याची घटना लोकमान्य टिळक रुग्णालयात म्हणजेच सायन रुग्णालय या नावाने परिचित असलेल्या ठिकाणी घडली आहे. मुंबईतलं हे रुग्णालयात मुंबई महापालिकेतर्फे चालवण्यात येतं. मद्यधुंद अवस्थेत राडा करत एका रुग्णाने महिला डॉक्टरला मारहाण केल्याची घटना घडली आहे. रविवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली अशी माहिती मार्डच्या डॉक्टरांनी दिल.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एका रुग्णाने मद्यधुंद अवस्थेत राडा घातला आणि एका महिला डॉक्टरला मारहाण केली. एक माणूस जखमी अवस्थेत लोकमान्य टिळक रुग्णालयात आला. त्याला गंभीर इजा झाली होती आणि त्याच्या जखमेला टाके घालावे लागणार होते. इतर डॉक्टरांनी त्याला आधीच टाके घातले होते आणि त्याच्या जखमेत अडकलेला कापूस डॉक्टर काढत होत्या, हे करावं लागतं कारण काय झालं आहे ते पाहण्यासाठी जखम मोकळी करावी लागते. त्यावेळी या रुग्णाला वेदना होऊ लागल्या ज्यानंतर त्याने डॉक्टरला ढकललं. या रुग्णाने मद्यपान केलं होतं अशी माहितीही समोर आली आहे. आम्ही याबाबत अधिक माहिती घेत आहोत असं पोलिसांनी स्पष्ट केलं. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा नोंदवला आहे. राज्य आरोग्य सेवा हिंसाचार प्रतिबंध कायद्याच्या अंतर्गत हा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मार्डचे सदस्य असलेले डॉक्टर अक्षय मोरे यांनी यासंदर्भातली एक पोस्ट लिहिली आहे. त्यांनी म्हटलं आहे की सायन रुग्णालयात हिंसाचाराची घटना घडली. पहाटे काही लोकांचा जमाव आला. त्यानंतर त्यातल्या काही जणांनी महिला डॉक्टरला मारहाण केली. त्यात ही महिला डॉक्टर जखमी झाली आहे. मद्यधुंद अवस्थेतल्या रुग्णाने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी महिला डॉक्टरच्या दिशेने रक्ताने माखलेले कापसाचे बोळेही फेकले. तसंच तिला नखांनी ओरखडलं त्याचप्रमाणे मारहाण कल असंही या पोस्टमध्ये म्हटलं आहे. डॉक्टरांच्या सुरक्षेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे असंही या डॉक्टरने म्हटलं आहे. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे.



'रुग्ण हा त्याच्या सात ते आठ साथीदारांसह आला होता. त्याने मद्यपान केलं होतं. तो कुणालातरी मारहाण करुन आला होता. त्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर जखमा होत्या. पहाटे साडेतीनच्या दरम्यान महिला डॉक्टर तपास होती. त्यासाठी आधीपासून जखमेची पट्टी काढावी लागणार होती. ही नॉर्मल प्रोसिजर आहे. नेमकं काय घडलं आहे हे पाहण्यासाठी जखमेची पट्टी काढावी लागते. यानंतर या रुग्णाने तिला शिव्या देण्यास सुरुवात केली. रुग्ण ओरडू लागल्याने इतर नातेवाईकांनी तिला शिव्या द्यायला सुरुवात केली. तिच्या दिशेने रक्ताने माखलेले बोळे फेकले. त्यावेळी महिला डॉक्टरांनी सुरक्षा रक्षकाला बोलवलं म्हणून तिला गंभीर स्वरुपातली मारहाण झाली नाही.' असं अक्षय मोरे यांनी सांगितलं आहे.

**Government of Maharashtra**
**Forest Department**
Mangrove Division- North Konkan
Abhiman-II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W)-400 602.
Email- dfomm.cu@gmail.com
**Parent Portal: http://mahatenders.gov.in**
**E-Tender**

**Tender Notice No. DFO/MDNK/01/2024-25.**
Online Tender Forms in B-1 Format, for the following work are invited by the Divisional Forest Officer, Mangrove Division North Konkan Thane. Abhiman- II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W) - 400 602. From the contractors registered with the Government of Maharashtra in appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website **http://mahatenders.gov.in** from 1**9/08/2024** at 11.00 am to 26/08/2024 at 03.00 pm.
Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors have to download tender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone no 022-69309286 during office hours.
All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available on the above said website.
If any assistance is required regarding e-Tendering (uploading/downloading) please contact NIC Help Desk number: 1800 3070 2232.

| Sr. No | Name of work | Estimated cost | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form (Non - Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 7 |
| 1 | Transportation, along with the loading and unloading of removed affected trees (Mangrove logs), for the Malad (W) Malvani Sewage Treatment Plant in the West Mumbai Range of the Mangrove Division- North Konkan. | 82,68,608/- (Including GST) | 82,686/ online net banking mode | 30 days | Rs. 1000/-+ GST Online net banking mode. |

1) No changes are to be made by the contractor in tender documents published on the website. If any changes are made the tender documents will be rejected action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.

2) Right to reject any or all the tenders without assigning any reason there of is reserved.

Divisional Forest Officer
Mangrove Division-North Konkan.

# पैशांच्या राशीत लोळणाऱ्यांना दीड हजार रुपयांचे मोल काय? मुख्यमंत्री शिंदेंचे टीकास्त्र



■ पुणे : अभिजीत येरल्लू

**पुण्यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ सोहळा पार पडला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व नेत्यांनी उपस्थिती लावली होती. दरम्यान, यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी योजनेच्या लाभार्थी महिलांशी संवाद साधला.**

यावेळी त्यांनी विरोधकांना सावत्र भाऊ म्हणत तुफान राजकीय फटकेबाजी केली. उद्धव ठाकरे यांना अप्रत्यक्षपणा टोला लगावून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपले भाषण रंगवले. मुख्यमंत्री शिंदे कार्यक्रमावेळी म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आम्ही वर्षाचे अर्थिक नियोजन केले आहे. हे काय म्हणाले तर दीड हजार रुपयांमध्ये काय होणार? सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले लोक, पैशांच्या राशीत लोळणाऱ्यांना दीड हजार रुपयांचे मोल काय कळणार? हे दीड हजार रुपयांचे मोल सर्वसामान्य महिलांना कळत आहे. हम दो हमारे दो एवढंच ज्यांना कळतं त्यांना दीड हजाराची किंमत काय कळणार. यांना गरीबी काय माहित आहे? मीही शेतकरी कुटुंबातून आलो आहे. माझी आई कशी कसरत करायची मला माहीत आहे. माझ्या आई वडिलांनी कसे हाल सहन केले याचा मी साक्षीदार आहे. आम्ही संघर्ष करून आलो. सोन्याचा चमचा घेऊन नाही आलो. आम्ही चटके सोसले आहेत, असा टोला एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना लगावला आहे

पुढे एकनाथ शिंदे म्हणाले, पैसे खात्यामध्ये जमा झाल्यानंतर अनेक बहिणी मला भेटल्या. त्यांनी पैसे मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. त्यांच्या चेहऱ्यावर मला आनंद दिसत होता. अनेक महिलांसाठी हे दीड हजार रुपये मोठा आधार बनले आहेत. काही विधवा बहिणी देखील आहेत, त्यांनी त्यांचं दुख मांडलं. हे लाख मोलाचे पैसे असल्याची भावना या बहिणींनी व्यक्त केली. या राज्यातील सामान्य बहीण भाऊ आणि वरिष्ठ ज्येष्ठांच्या आयुष्यात सुखाचे दिवस आणायचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण करतो. आमचं सरकार तेच करतं. सर्व सामान्यांसंसाठी या योजना राबवत असतो. काही लोकं म्हणाले पैसे मिळणार नाही. आता पैसे आल्यावर म्हणतात लवकर काढून घ्या. पण तुम्हाला सांगतो हे देणारं सरकार आहे. घेणारं नाही. ही देना बँक आहे. लेना बँक नाही. ज्या बहिणीच्या खात्यात पैसे गेले नसतील त्यांच्या खात्यात पैसे जाईल. ज्यांचं आधार लिंक राहिलं असेल त्यांनाही पैसे मिळेल. ३१ ऑगस्ट पर्यंत मुदत आहे. ऑगस्टमध्ये अर्ज भरल्यावर तुम्हाला जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरचे पैसे मिळतील.

## तरुणांमध्ये वाढतोय ऑनलाईन बुलिंग; होत आहे सायबर गुन्हेगारी प्रमाणात वाढ

■ मुंबई : यश सावंत

सध्याच्या अल्पवयीन तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात इंटरनेट आणि मोबाईलचा वापर होत आहे. अशामध्ये इंटरनेटच्या अतिवापरामुळे या तरूणांमध्ये सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. तसेच यामुळे मुलांपुढे अनेक मानसिक तसेच सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. नुकतेच समोर आलेल्या माहितीनुसार, समाज माध्यमे, वेबसाईट, ॲप आदी डिजिटल माध्यमांतून एखाद्याला मानसिक त्रास देण्याच्या 'ऑनलाईन बुलिंग' या विकृतीने १६ ते ३० या वयोगटांमधील तरुणाईला ग्रासले आहे. ऑनलाईन बुलिंग म्हणजे थोडक्यात सांगायचे झाले तर इंटरनेटद्वारे केली जाणारी गुंडगिरी. याद्वारे एखाद्याच्या आयुष्यातील खासगी, गुप्त माहिती समाजासमोर आणली जाते. यामुळे त्या व्यक्तीला मानसिक, शारीरिक त्रास देण्याचा प्रकार समाज माध्यमांमधून केला जातो. विशेष म्हणजे १४ ते २२ वयोगटांतील मुलंच



इतरांना या माध्यमातून त्रास देत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. एखाद्या ऑनलाईन विक्री साईटवर एका व्यक्तीच्या वस्तूबद्दल खोटी माहिती टाकून त्यांचा नंबर दिला जातो. संबंधितांचा नंबर दिलेल्या व्यक्तीला दिवसरात्र फोन येत राहतात. अशा प्रकारच्या त्रास देण्याच्या गुन्ह्यातही लक्षणीय वाढ झाली आहे. ऑनलाईन बुलिंगमध्ये ई-मेल, सोशल मिडिया साईटस्, ॲप अथवा खासगी साईटचा पासवर्ड हॅक करून एखाद्या व्यक्तीची गोपनीय माहिती सोशल मिडीयाच्या माध्यमातून पसरवली जाते. मुलींबाबत शारीरिक बाबी जसे लठ्ठपणा, रंग, कोड, बुटकेपणा यावर अत्यंत असभ्य भाषेत मजकूर लिहून त्याचा सर्वत्र प्रसार केला जातो. इतकेच नव्हे, तर मित्र-मैत्रिणींच्या मोबाईल कॅमेऱ्यातून चित्रीकरण केलेले फोटो किंवा व्हिडीओ यूट्यूबवर टाकण्याचे प्रकारही वाढले आहेत. पोलिस आयुक्तालयामधील आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेल्या सायबर सेलद्वारे अशा गुन्ह्यांचा छडा माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये लावला जातो.

## भास्कर जाधव मुलासाठी मतदारसंघ बदलणार? पराभवाचा डाग पुसण्यासाठी आता...

■ चिपळूण : सम्यक कासारे

शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव गुहागर विधानसभा मतदारसंघाची जागा त्यांचे पुत्र विक्रांत जाधव याला सोडून ते चिपळूण मधून विधानसभेची निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. यासंदर्भात सध्या राजकीय चर्चा सुरू आहे. पक्षाचे निरीक्षण आमदार मिलिंद नार्वेकर यांनी नुकतेच कोकणचा दौरा केला. यावेळी आमदार जाधव यांची आमदार नार्वेकर यांच्याशी यासंदर्भात चर्चा झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

आमदार भास्कर जाधव सध्या गुहागरचे आमदार आहेत. या मतदारसंघातून त्यांनी सलग तीन वेळा विजय मिळवला आहे. नुकतेच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना सत्तावीस हजाराचे मताधिक्य मिळवून दिले. त्यामुळे गुहागर मध्ये महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या शिवसेनेची ताकद मजबूत आहे. २००४ च्या



विधानसभा निवडणुकीत भास्कर जाधव यांचा चिपळूणमध्ये पराभव झाला होता. चिपळूण मधून ते सलग दोन वेळा विजय झाले होते. तिसऱ्या वेळी त्यांचा पराभव झाला. भास्कर जाधव यांना तो पराभवाचा डाग पुसायचा आहे. तसेच मुलगा विक्रांत याला आमदार बनवायचे आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष फुटल्यानंतर राज्यात निर्माण झालेली परिस्थिती भास्कर जाधव यांना चिपळूण मधून पुन्हा जिंकण्यासाठी तसेच गुहागर मधून मुलगा विक्रांत याला आमदार बनवण्यासाठी अनुकूल वाटत आहे. त्यामुळे गुहागरची जागा ते मुलासाठी सोडणार असून ते चिपळूण मधून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. या संदर्भात भास्कर जाधव यांनी अधिकृतपणे आपली भूमिका व्यक्त केलेली नाही. मात्र रत्नागिरी रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांचे विश्वासू आमदार मिलिंद नार्वेकर यांनी नुकतेच कोकणचा दौरा केला.

## महाविकास आघाडी आणि महायुतीसंदर्भात राजू शेट्टींचा मोठा दावा; म्हणाले, 'शेवटपर्यंत एकसंध...'

■ मुंबई : विशाल कारंडे

विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर आल्याने महाराष्ट्रात राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली असून विविध मतदारसंघात सध्या नेत्यांचे दौरे सुरु आहेत. या दौऱ्याच्या माध्यमातून आगामी निवडणुकीसंदर्भात उमेदवारांची आणि मतदारसंघाची चाचपणी नेत्यांकडून करण्यात येत आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा प्रमुख सामना पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

याच अनुषंगाने महाविकास आघाडी आणि महायुतीमधील पक्षाची तयारीही सुरु असल्याचं दिसून येत आहे. मात्र, असं असतानाच आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांनी मोठा दावा केला आहे. 'महाविकास आघाडी आणि महायुती शेवटपर्यंत एकसंध राहतील असं वाटतं नाही', असं राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.'चळवळीची पार्श्वभूमी असणारे राज्यातील छोटे-छोटे पक्ष असतील किंवा काही सामाजिक संघटना असतील या सर्वांना एकत्र करून त्या-त्या मतदारसंघात एखादा आश्वासक चेहरा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. मतदारसंघाला दिशा देण्यासाठी त्या उमेदवाराकडे व्हिजन असेल असे उमेदवार शोधून त्यांच्या पाठिमागे उभा राहण्याचा आमचा प्रयत्न आहे. काही मोजके प्रतिनिधी निवडून आणायचे जेणेकरून भविष्यात सत्ता कोणाचीही आली तरी त्यांच्यावर अंकुश ठेऊन सर्वसामान्य लोकांचे प्रश्न विधानसभेत त्यांनी मांडले पाहिजेत. यासाठी आमचा प्रयत्न सुरु आहे', असं राजू शेट्टी म्हणाले.

'स्वाभिमानी शेतकरी संघटना असेल किंवा शेतकरी चळवळीशी संबधित असलेल्या नेत्यांशी आणि छोट्या-छोट्या



पक्षांशी आम्ही चर्चा करत आहोत. या सर्वांना बरोबर घेण्याचा प्रयत्न आमचा असेल. महाराष्ट्राच्या राजकारणाचा दर्जा सध्या खूप खालवला आहे. त्यामुळे आम्ही काही आश्वासक चेहरे देऊन जनतेसमोर एक चांगला पर्याय देण्याचा प्रयत्न करणार आहोत. आम्हाला सत्तेची हाव नाही. पण सध्या ज्या पद्धतीचे राजकारण सुरु आहे, त्यावर अंकुश ठेवण्यासाठी काही आश्वासक चेहऱ्यांची गरज आहे', असंही राजू शेट्टी यांनी सांगितलं.

स्वाभिमानी शेतकरी संघटना भविष्यात महायुतीबरोबर जाऊ शकते का? या प्रश्नावर बोलताना राजू शेट्टी म्हणाले, 'आम्ही महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यापासून समान अंतर ठेवून आहोत. छोट्या-छोट्या घटकांना एकत्रित करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

## हरियाणा, जम्मू काश्मीरच्या निकालांचा राज्यावर परिणाम?

■ मुंबई : यश सावंत

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक दिवाळीनंतर होणार असल्याने सत्ताधारी महायुतीला सरकारी योजनांची जाहिरातबाजी करण्यास पुरेसा अवधी मिळणार असला तरी महाविकास आघाडीसाठी निवडणूक लांबणीवर पडणे गैरसोयीचे ठरणारे आहे. तसेच जम्मू आणि काश्मीर तसेच हरियाणा या दोन्ही राज्यांच्या निकालांचा राज्यावर नक्कीच परिणामकारक ठरू शकतो. भाजपचा पराभव झाल्यास महायुतीसाठी ते धोकादायक ठरू शकते.

महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपुष्टात येत असल्याने दिवाळीनंतर नोव्हेंबरमध्ये निवडणूक होईल, असे संकेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले. विधानसभेची मुदत संपण्यास अद्याप दोन महिन्यांचा कालावधी शिल्लक असल्याने सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांना लोकप्रिय सरकारी योजनांची जाहिरातबाजी करण्यास पुरेसा अवधी मिळाला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, अन्नपूर्णा योजना, लाडका भाऊ, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज आदी लोकप्रिय घोषणांचा लोकांना लाभ मिळाला तरच त्याचा निवडणुकीत फायदा होऊ शकतो. पुढील महिनाभर तरी या योजनांची जोरदार हवा तयार करण्याची महायुतीच्या नेत्यांची योजना आहे. यामुळेच निवडणूक लांबणीवर जाणे हे सत्ताधारी पक्षाला आवश्यकच होते. निवडणूक दिवाळीपूर्वी होणे महाविकास आघाडीसाठी फायद्याचे होते. महाराष्ट्राप्रमाणेच हरियाणामध्ये लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी भाजपच्या विरोधातील असंतोष बघायला



मिळाला. दहापैकी प्रत्येकी पाच जागा भाजप आणि काँग्रेसने जिंकल्या आहेत. २०१९ मध्ये भाजपने सर्व दहाही जागा जिंकल्या होत्या. हरियाणाचा कौल भाजपच्या विरोधात गेल्यास त्याचा राज्यावरही राजकीय परिणाम होऊ शकतो. हरियाणा जिंकल्यास भाजपला राज्यातही प्रचाराला अधिक वाव मिळेल.

दिवाळीनंतर निवडणूक होणार असल्याने सर्वपक्षीय विद्यमान आमदार, इच्छुकांना दिवाळीनिमित्त मतदारांना खुश करावे लागणार आहे. दिवाळीनंतर निवडणूक असल्याने खर्चात वाढ होणार असल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. कारण दिवाळीत मतदारांना खुश करण्याकरिता खर्च वाढणार आहे, अशी प्रतिक्रिया एका उमेदवाराने व्यक्त केली.

## अमोल कोल्हेंची अजित पवारांवर टीका; म्हणाले, 'सेनापतीच गळपटला तर...'

■ मुंबई : सम्यक कासारे

राज्यात विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर आल्यामुळे राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. या निवडणुकीच्या आधी सर्वच पक्षांच्या नेत्यांनी महाराष्ट्रात दौरे सुरु केले आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून पक्ष संघटना मजबूत करत सभा, बैठका आणि मतदारसंघाचा आढावा घेतला जात आहे. यावेळी होणाऱ्या वेगवेगळ्या संभामधून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप रंगले आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या आधीच महाराष्ट्रात राजकारण तापलं आहे.

यातच आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडणुकीसंदर्भात मोठं निधान केलं. 'मी ७ ते ८ वेळा निवडणूक लढलो, आता मला रस राहिला नाही', असं अजित पवार यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळाच चर्चांना उधाण आलं. यानंतर आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार



अमोल कोल्हे यांनी अजित पवारांवर नाव न घेता खोचक टीका केली आहे. 'सेनापतीच गळपटला असेल सैन्यांनी लढायचं कसं? हा त्यांच्यामधील नेत्यांना प्रश्न पडला असेल', असं अमोल कोल्हे यांनी म्हटलं आहे.'चार दिवस सासूचे आणि चार दिवस सुनेचे, असं म्हणतात. मात्र, इथे अजित पवार हे जवळपास २२ वर्ष सत्तेत होते. त्यामुळे ते ६६ टक्के सत्तेत आणि ३३ टक्के विरोधात अशी अजित पवार यांची कारकीर्द राहिलेली आहे. मात्र, आता आता पराभव समोर दिसत असल्यामुळे की महायुतीत त्यांची घुसमट होत आहे? अजित पवारांबरोबर जाण्यासाठी ज्या-ज्या लोकांनी शरद पवारांचं बोट सोडलं. त्या प्रत्येकाची मला चिंता वाटते. कारण सेनापतीच गळपटला तर सैन्यांनी लढायचं कसं? हा प्रश्न आता त्यांना नक्कीच पडला असेल', अशी खोचक टीका अमोल कोल्हे यांनी अजित पवार गटाच्या नेत्यांवर केली.

## मांडवा-गेटवे जलवाहतूक १ सप्टेंबरपासून सुरू होणार, गणेशोत्सवासाठी येणाऱ्या चाकरमान्यांना दिलासा

■ अलिबाग : नितीन देवळेकर

मांडवा ते मुंबई (गेट वे ऑफ इंडिया) दरम्यान समुद्रातील फेरी बोटीतून होणारी प्रवासी जलवाहतूक १ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. मान्सूनमध्ये खवळणाऱ्या समुद्रामुळे ही वाहतूक २६ मे पासून बंद ठेवण्यात आली होती. गौरी-गणपती निमित्ताने अलिबाग, मुरुड येथे येणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर होणार आहे. पावसाळयाच्या दिवसात ही सेवा बंद ठेवण्यात येत असते. पावसाळा संपत आल्यानंतर हवामान आणि समुद्राच्या लाटांचा अंदाज घेवून मेरीटाइम बोर्ड ही सेवा सुरू करण्याबाबत निर्णय घेत असते. हा मार्ग खुला होत असल्याने मुंबईतील पर्यटकांचा ओघ अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन स्थळांकडे वाढणार आहे. आठ महिने मांडवा ते गेटवे, गेटवे ते अलिबाग मांडवा असा प्रवास बोटीने प्रवास करणाऱ्यांची संख्या मेरीटाईम बोर्डाच्या माहितीनुसार पंधरा लाखांच्या आसपास आहे. या जलमार्गावरून पीएनपी, मालदार, अजंठा, अपोलो या कंपन्यांच्या प्रवासी बोटी सुरू असतात. ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सव सुरू होत आहे. हा मार्ग खुला होत असल्याने गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना दिलासा मिळणार आहे. मुंबईतील पर्यटकांचा ओघ अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन स्थळांकडे वाढणार आहे. आठ महिने मांडवा ते गेटवे, गेटवे ते अलिबाग मांडवा असा प्रवास बोटीने प्रवास करणाऱ्यांची संख्या मेरीटाईम बोर्डाच्या माहितीनुसार पंधरा लाखांच्या आसपास आहे.



१ सप्टेंबरपासून मांडवा ते गेटवे ऑफ मुंबई हा मार्ग मध्यम आकाराच्या फेरीबोटींसाठी खुला होणार आहे. खराब हवामानाचा जोपर्यंत अडथळा निर्माण होत नाही तोपर्यंत या मार्गावर दिवसा जलवाहतूक सुरु राहिल. तशा सुचना सबंधीत वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना देण्यात आल्या आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी फेरीबोट सुरु करण्यापूर्वी त्यांची डागडुजी, सुरक्षा साधनांची तपासणी करुन घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत अशी माहिती प्रादेशिक बंदर अधिकारी डॉ. सी. जे. लेपांडे यांनी दिली.

## 'शांतता प्रस्थापित करायची असेल तर...', राज्यातील तणावपूर्ण स्थितीवर शरद पवारांचे महत्त्वाचे भाष्य

■ मुंबई : राकेश गायकवाड

बांगलादेशमध्ये सत्तांतर झाल्यानंतर तेथील हिंदू अल्पसंख्याकांवर अत्याचार होत असल्याच्या बातम्या पुढे येत आहेत. त्यावर आता देशात ठिकठिकाणी प्रतिक्रिया उमटत आहेत. महाराष्ट्रातही काही ठिकाणी त्याचे पडसाद पाहायला मिळाले. यानंतर राज्यात काल तणावपूर्ण परिस्थिती दिसली. यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी जनतेला शांततेचे आवाहन केले असून बांगलादेशमध्ये घडणाऱ्या गोष्टींचा राज्यावर परिणाम होऊ देऊ नका, असे सांगितले आहे.

'बांगलादेशमध्ये सत्तांतर झाले. यासाठी तरुण पिढीने उठाव केला होता. त्यातून काही गोष्टी घडल्या. पण दुर्दैवाने त्याची प्रतिक्रिया भारतात



काही ठिकाणी उमटली. प्रामुख्याने बांगलादेशच्या सीमेवरील पश्चिम बंगाल आणि इतर राज्यात परिस्थिती अधिक गंभीर होती. पण तिथे काही घडले त्याचे परिणाम महाराष्ट्रात उमटतील, असे कधी वाटले नव्हते. याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. पण आज समाजातील सर्व घटकांमध्ये एकवाक्यता आणि सामंजस्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात जे काही घडले, ते राज्याच्या हिताचे नाही. राज्यात शांतता प्रस्थापित करायची असेल तर समाजकारण आणि राजकारणातील व्यक्तींनी सयंमाचा पुरस्कार करावा आणि शांतता कशी राहिल, याबद्दलची खबरदारी घ्यावी, एवढेच मी सांगू इच्छितो', असे पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले की, 'शासनाचे धोरण, शासनाची कारवाई, गृहखात्याची जबाबदारी यावर भाष्य करता येईल. मात्र आज मला शांतता आणि सौहार्द याचे जास्त महत्त्व वाटते. म्हणून मी अन्य बाबींवर भाष्य करू इच्छित नाही. शांतता कशी प्रस्थापित होईल, याबाबत मी अधिक आग्रही आहे. अन्य काही देशात घडणाऱ्या गोष्टींसाठी आपल्या राज्यातील लोकांचे जीवन संकटात येईल, असे काही करू नये हे माझे आवाहन आहे.' भारताच्या स्वातंत्र्य दिना निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण करत असताना संबंध देशाच्या निवडणुका एकत्र व्हाव्यात, अशी भूमिका मांडली.

## रायगडमधून ठाण्याकडे जाणाऱ्या अवजड वाहतुकीवर बंदी, जिल्हाधिकारी यांच्याकडून वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी

■ अलिबाग : प्रथमेश चव्हाण

रायगड जिल्ह्यातून ठाणे जिल्ह्यात जाणाऱ्या अवजड वाहतूकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. १६ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीसाठी हे निर्बंध लागू राहणार आहेत. ठाण्यातील वाहतुक कोंडीची समस्या लक्षात घेऊन रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतची वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी केली आहे. ठाणे शहर आणि त्यालगतच्या परिसरात होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येला लक्षात घेऊन शहरात सकाळ आणि संध्याकाळच्या गर्दीच्या सत्रात जड आणि अवजड वाहतूक नियंत्रिक करण्याचे निर्देश



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यानूसार रायगड जिल्ह्यातून ठाणे शहराकडे जाणाऱ्या जड आणि अवजड वाहतूकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. पहाटे ४ ते सकाळी दहा वाजेपर्यंत आणि दुपारी दोन ते रात्री नऊ वाजेपर्यंत हे निर्बंध लागू राहणार आहेत. या कालावधीत जड आणि अवजड वाहने, कंटेनर्स, मल्टी ॲक्सल वाहने यांना ठाणे शहर आणि त्या लगतच्या परिसरात जाता येणार नाही. जिवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणारे ट्रक, पोलीस, अग्नीशामन दल, रुग्णवाहीका आणि प्रवासी वाहतूक करणारी वाहने यांच्यासाठी हे निर्बंध लागू नसतील असेही या आदेशात स्पष्ट नमुद करण्यात आले आहे.